बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक : बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ | वर्ष४थे | अंक२९९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# दहशतवाद्यांनी आखला होता 'बाबरी'चा बदला घेण्याचा कट

## ६ डिसेंबरला ब्लास्ट करण्यासाठी एक-दोन नव्हे, तब्बल ३२ कारचा होणार होता वापर

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

दिल्ली कार ब्लास्ट प्रकरणाचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसा दहशतवाद्यांच्या भीषण कारस्थानांचा पर्दाफाश होत आहे. आतापर्यंत केवळ चार कारांपर्यंत मर्यादित वाटणाऱ्या 'व्हाईट कॉलर टेरर' कटाचा विस्तार आता तब्बल ३२ कारपर्यंत पोहोचल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महतत्वाचे म्हणजे, जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांनी या कारचा वापर ६ डिसेंबर रोजी, बाबरी मशीद पाडल्याच्या घटनेचा 'बदला' घेण्यासाठी करण्याचा प्लॅन आखल्याचे तपासामध्ये समोर आले आहे.

या सर्व कारची तयारी स्फोटके वाहून नेणे आणि स्फोट घडविणे यासाठी सुरू होती. सोमवारी झालेल्या स्फोटात वापरलेली ह्युंदाई आय२० ही त्यांपैकी एक कार. याशिवाय मारुती ब्रेझा, स्विफ्ट डिजायर आणि फोर्ड इकोस्पोर्ट या कारही जप्त करण्यात आल्या आहेत. या सर्व कारचा वापर ६ डिसेंबर रोजी विविध ठिकाणी दहशतवादी हल्ल्यांसाठी करण्यात येणार होता. महत्त्वाचे म्हणजे, हल्ल्यांसाठी जी ठिकाणे निवडण्यात आली होती, त्यांतील ६ ठिकाणे एकट्या एकट्या दिल्लीत होती, असे सांगण्यात येत आहे.

ज्या कार आतापर्यंत वापरल्या गेल्या, त्या जुन्या आणि अनेकांना विक्री झालेल्या असल्याने वापरण्यात आल्या. पोलिसांना कटाच्या मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचणे अवघड व्हावे, हा या मागचा हेतू. आतापर्यंत तीन कार पोलिसांनी जप्त केल्या आहेत, तर चौथी कार स्फोटात उडवण्यात आली.



### स्फोटातील मृताचा हात दुकानाच्या छतावर

दिल्ली स्फोटाला २ दिवस होऊन गेले आहेत. पण दिल्ली पोलिसांसह तपास यंत्रणांना आताही पुरावे आणि मृतदेहांचे अवयव सापडत आहेत. गुरुवारी सकाळी बॉम्ब स्फोट झालेल्या ठिकाणापासून ३०० मीटर दूर असलेल्या एका दुकानाच्या छतावर एका माणसाचा हात सापडला आहे. स्फोट झाल्यानंतर कारच्या जवळ असलेल्या व्यक्तीच्या मृतदेहाच्या चिंधड्या उडाल्या. त्याचा हात शरीरापासून वेगळा होऊन न्यू राजपत रॉय मार्केटमधील दुकानाच्या छतावर जाऊन पडला. दिल्ली पोलीस घटनास्थळाची पाहणी करत होते. घटनास्थळावरून पुरावे गोळा करतानाच पोलिसांना दुकानाच्या छतावर छिन्नविच्छिन्न अवस्थेत हात आढळून आला. त्यांनी हात ताब्यात घेतला. त्याची अवस्था पाहून तपास अधिकाऱ्यांना धक्का बसला.

### दिल्ली स्फोट प्रकरणात डॉ. फारुकला अटक

दिल्लीतील भीषण बॉम्बस्फोट प्रकरणात दिल्ली पोलिसांनी उत्तर प्रदेशातील हापूड जिल्ह्यातील जी. एस. मेडिकल कॉलेजमधील प्रसूती विभागातील असिस्टंट प्राध्यापक डॉ. फारुक याला ताब्यात घेतले आहे. डॉ. फारुकने हरियाणातील फरिदाबाद येथील अल-फलाह विद्यापीठातून एमबीबीएस आणि एमडी पदवी प्राप्त केली होती. तपास यंत्रणांना संशय आहे की, या विद्यापीठातील काही इतर डॉक्टरांप्रमाणेच डॉ. फारुकचेही दहशतवादी संघटनांशी संबंध असू शकतात. हापूडमधून त्यांना ताब्यात घेतल्यानंतर दिल्ली पोलिसांनी चौकशीसाठी दिल्लीला नेले असून, त्याच्याकडून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आतापर्यंत अटक झालेल्यांमध्ये अल-फलाह विद्यापीठातील डॉ. मुजम्मिल गनई, त्याची मैत्रीण डॉ. शाहीन शाहिद, सहारनपूरमधील फेमस हॉस्पिटलचा डॉ. आदिल अहमद राठर, तसेच डॉ. शाहीनचा भाऊ डॉ. परवेज अन्सारी यांचा समावेश आहे.

---

# जागा एससीची उमेदवारी मात्र डुप्लिकेट लोकांनाच कशामुळे?

पुण्यभूमी प्रतिनिधी,
बीड: नगरपालिकेच्या इतिहास-ात पहिल्यांदाच नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी राखीव ठरले आहे. या निर्णयाने आंबेडकरी समाजात एक नवीन आशा निर्माण झाली होती की, यावेळी खऱ्या अर्थाने दलित समाजा-तून उभी राहिलेली महिला उमेदवार नगराध्यक्षपदी बसून सामाजिक न्यायाची नवी दिशा देईल.मात्र, प्रत्यक्षात परिस्थिती उलटीच दिसत आहे. प्रस्थ-ापित राजकीय पक्षांनी या जागेवर खऱ्या दलित समाजा-तील उमेदवाराला नाकारून कागदोपत्री एससी अस-लेल्या डुप्लिकेट उमेदवारांना पुढे केल्याने संताप उसळला आहे.आंबेडकरी समाजातील




कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, एससी आरक्षणाच्या जागा या सामाजिक न्यायासाठी राखीव आहेत; त्या राजकीय खेळास-ाठी नव्हेत. काही पक्ष तथा-कथित एससी प्रमाणपत्रधारक उमेदवारांना उभे करून मूळ दलित समाजाचे प्रतिनिधित्व हिरावून घेत आहेत.ही घु-सखोरी नाही, तर संविधाना-वरच आघात असूनआरक्षणाचा फायदा घेऊन मूळ समाजाला डावलले जात आहे,खऱ्या दलित महिलेला वगळून, दुसऱ्या समाजातील व्यक्तीला केवळ कागदोपत्री अनुसूचित दाखवून उमेदवारी देणे ही सामाजिक फसवणूक आहे. हा खेळ आता ओळखण्याची आणि थांबवण्याची वेळ आली आहे.त्यांच्या मते, हे केवळ एका पदाचे राजकारण नाही, तर आंबेडकरी समाजाच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्न आहे.दलित समाजाला दिलेल्या आरक्षणाच्या जागा हे संविधानिक शस्त्र आहे, आणि त्यावर कुणाचीही मक्तेदारी चालणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

---

## एक कोटी लाडक्या बहिणींकडून केवायसी पूर्ण

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना ई केवायसी प्रक्रिया १८ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करायची आहे. ही ई केवायसी पूर्ण करण्यासाठी आता ५ दिवसांचा वेळ शिल्लक राहिला आहे. लाडकी बहीण योजना महिला व बालविकास विभागाकडून जुलै २०२४ पासून राबवली जाते. दररोज चार ते पाच लाख महिलांची ई केवायसी प्रक्रिया ही साईटवर पूर्ण होत आहे. गुरुवारपर्यंत १ कोटी महिलांची ई केवायसी पूर्ण झाली असल्याची माहिती तटकरे यांनी दिली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वेबसाईटवर ई केवायसी प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ज्या महिला एकल आहेत किंवा ज्या महिलांच्या वडिलांचे आणि पतीचे निधन झाले आहे. ज्या महिला घटस्फोटित आहेत, अशा महिलांना ई केवायसी प्रक्रिया करता येत नव्हती. अखेर महिला व बालविकास विभागाने त्याची दखल घेतली आहे. आदिती तटकरे यांनी अशा महिलांसाठी वेबसाईटमध्ये तांत्रिक बदल करणार असल्याचे सांगितले आहे.

---



### 'विचारा इस्लाम'च्या कसून चौकशीचे आदेश

**नागपूर :** अमरावतीमधील 'विचारा इस्लाम' या पोस्टरची गंभीर दखल घेत अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांना अहवाल मागितला असून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले. अमरावतीचे सामाजिक वातावरण बिघडता कामा नये. अमरावतीमध्ये काही महिन्यांपूर्वी 'आय लव मोहम्मद' असे आशयाचे पोस्टर लावण्यात आले होते.

## वेचक

### फ्रीचे वायफाय वापरणे पडेल महागात!

**मुंबई :** रेल्वे स्टेशन, एअरपोर्ट, कॅफे किंवा शॉपिंग मॉल्स अशा सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असलेले पब्लिक वाय-फाय वापरणाऱ्यांमध्ये तुम्हीही असाल, तर वेळीच सावध व्हा! तंत्रज्ञान क्षेत्रातील महाकाय कंपनी गुगलने आता सार्वजनिक वाय-फाय वापरणाऱ्यांसाठी थेट गंभीर धोक्याचा इशारा जारी केला आहे. गुगलचे म्हणणे आहे की, हे पब्लिक वाय-फाय नेटवर्क्स पूर्णपणे असुरक्षित असतात आणि सायबर गुन्हेगारांसाठी लोकांना त्यांच्या जाळ्यात ओढण्याची ही एक मोठी संधी ठरते.

### 'अल-फलाह' संकटात!

**नवी दिल्ली :** दिल्लीतील लाल किल्ला बॉम्बस्फोटानंतर चर्चेत आलेले फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठ नव्या वादात सापडले आहे. राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदने या विद्यापीठावर खोट्या मान्यतेचा दावा केल्याचा आरोप केला आहे. एनएएसीने विद्यापीठ प्रशासनाला नोटीस बजावून ७ दिवसांच्या आत उत्तर न दिल्यास विद्यापीठाची मान्यता रद्द करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अल-फलाह विद्यापीठाची स्थापना २०१४ साली हरियाणा प्रायव्हेट युनिव्हर्सिटी अॅक्ट अंतर्गत झाली होती.

### 'ती' रेशन दुकाने पुन्हा सुरू होणार

**मुंबई :** हजारो रेशन दुकाने विविध कारणांमुळे कायमस्वरूपी रद्द झाल्यामुळे होणारी कार्डधारकांची गैरसोय दूर होण्याची शक्यता आहे. रद्द झालेल्या दुकानांचे परवाने नव्याने वाटप करून ही दुकाने पुन्हा सुरू करण्याबाबत राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे सूचना केल्या आहेत. राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षांनी जिल्ह्यांचा आढावा घेतला असता, अनेक जिल्ह्यांमध्ये कायमस्वरूपी रद्द झालेली शेकडो व राज्यात हजारो रास्त भाव दुकाने असल्याचे निदर्शनास आले आहे.

---

# मुलीच्या साखरपुड्यावरून ट्रोल करणाऱ्यांवर भडकले इंदुरीकर महाराज!

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकारांपैकी एक म्हणून इंदुरीकर महाराज ओळखले जातात. त्यांच्या कीर्तनाचे व्हिडीओ हे सोशल मीडियावर कायमच चर्चेत असतात. पण गेल्या काही दिवसांपासून इंदुरीकर महाराज हे खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहेत. त्यांनी लेकीचा साखरपुडा मोठ्या थाटामाटात केला. साखरपुड्याचा थाट पाहून अनेकांनी इंदुरीकर महाराजांवर टीका केली. यावर आता इंदुरीकर महाराज यांनी संताप व्यक्त केला आहे.

इंदुरीकर महाराज हे अनेकदा कीर्तनातून साधेपणाने लग्न करण्याचा उपदेश लोकांना देत असतात. याबाबत बोलतानाचे त्यांचे व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण त्यांनी लेकीचा साखरपुडा थाटात केल्याने त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. त्यांनी एका कीर्तनात मुलीला ट्रोल करणाऱ्यांना चांगलेच सुनावले आहे.

इंदुरीकर महाराजांनी एका कीर्तनामध्ये म्हटले की, मला तुम्ही घोडे लावा, माझा पिंड गेलाय. पण या कॅमेरावाल्यांनी आठ दिवसांत माझे जगणे मुश्कील करून टाकले... मुलगी तुम्हालाही आहे. तुमच्या



मुलीच्या कपड्यावर एखाद्याने कमेंट केली, तर तुम्हाला काय वाटेल?

पुढे इंदुरीकरांनी कीर्तनामध्ये मुलीच्या साखरपुड्याचे कपडे कोणी घेतले होते? हे सांगितले आहे. इंदुरीकर महाराज संताप व्यक्त करत म्हणाले की, मुलीच्या साखरपुड्यात कपडे नवरदेवाकडचे घेतात की मुलीकडचे घेतात? मग कपडे त्यांनी आणले असतील की म्या घेतले असतील? एवढी तरी क्लिप टाकणाऱ्यांना लाज पाहिजे ना.

---

# शिवसेनेकडून निवडणूक प्रभारींची घोषणा

## सिंधुदुर्गची आमदार निलेश राणे, आमदार दीपक केसरकरांवर जबाबदारी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

आगामी नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी शिवसेनेकडून निवडणूक प्रभारींची गुरुवारी शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली. पक्षाने राज्यभरातील ३१ जिल्ह्यांसाठी निवडणूक प्रभारींची यादी जाहीर केली असून यात शिवसेना मंत्री खासदार यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेना पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी खास रणनीती तयार केल्याचे या यादीतून दिसून येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पक्षाकडून निवडणूक प्रभारी जाहीर करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शिवसेना पक्ष आणि महायुतीला कोणताही धक्का बसू नये, यासाठी अत्यंत काटेकोर नियोजन करत राज्यभरातील ३१ जिल्ह्यांसाठी निवडणूक प्रभारींची यादी जाहीर करण्यात आली आहे.



या प्रभारींना स्थानिक स्तरावर कार्यकर्त्यांशी समन्वय साधून पक्षाची धोरणे, विकासकामे आणि महायुती सरकारची लोकहिताची कामे आणि योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

सिंधुदुर्गसाठी आमदार निलेश राणे, आमदार दीपक केसरकर, रत्नागिरीसाठी मंत्री उदय सामंत, माजी आमदार सदानंद चव्हाण, मंत्री योगेश कदम, आमदार किरण सामंत, माजी आमदार राजन साळवी, रायगडसाठी मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेंद्र दळवी, पुण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे, आमदार शरद सोनावणे, अहिल्यानगरसाठी आमदार विठ्ठल लंगे पाटील, माजी खासदार सदाशिव लोखंडे, आमदार अमोल खताळ, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, धुळेसाठी आमदार मंजुळा गावित, जळगावसाठी मंत्री गुलाबराव पाटील, आमदार किशोर आप्पा पाटील, आमदार चंद्रकांत सोनावणे, आमदार अमोल पाटील, आमदार चंद्रकांत पाटील, माजी आमदार गिरीश चौधरी आणि नाशिकसाठी आमदार सुहास कांदे, आमदार किशोर दराडे, माजी आमदार धनराज म्हाले, माजी खासदार हेमंत गोडसे, उपनेते विजय करंजकर यांच्यावर निवडणूक प्रभारींची जबाबदारी सोपविली आहे.

---

# पशुसंवर्धन विभागाच्या १५ एकर जमिनीची परस्पर विक्री?

## पुण्यात आणखी एक जमीन घोटाळा

◆ पुणे (प्रतिनिधी) :

मुंढवा आणि बोपोडी जमीन प्रकरणापाठोपाठ पुन्हा एकदा शासकीय जमीन विक्री घोटाळा समोर आला आहे. ताथवडे येथील १५ एकर शासकीय जागेची परस्पर विक्री करण्यात आल्याचे समोर आलं आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील ताथवडे परिसरातील पशुसंवर्धन विभागाची सर्वे नंबर २० येथील १५ एकर जागेची परस्पर विक्री कोट्यवधी रुपयांत करण्यात आली आहे. हेरंब गुपचूप नावाच्या व्यक्तीने जानेवारी २०२५ मध्ये या जागेची विक्री परस्पर केली आहे.

पशुसंवर्धन विभागाला अंधारात ठेवून या जागेची विक्री करण्यात आली आहे. मुद्रांक शुल्क



विभागाकडून याबाबतची माहिती जेव्हा पशुसंवर्धन विभागाला कळविण्यात आली, त्यानंतर पशुसंवर्धन विभागाच्या आयुक्तांनी या विषयाची तक्रार पुण्याचे विभागीय आयुक्ताकडे केली आहे. आता या प्रकरणात पुण्याचे विभागीय आयुक्त आणि पशुसंवर्धन विभागाकडून चौकशी सुरू आहे. मात्र पिंपरी-चिंचवड शहरातील कोट्यवधी रुपयांची शासकीय मोक्याची जागा यानिमित्ताने लाटण्याचा प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे.

---

# मुंबई महापालिका निवडणुकांसाठी शाळांमध्येच मतदान

## रहिवासी सोसायट्यांमध्ये केंद्र न ठेवण्याच्या आयुक्तांना सूचना

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मुंबईतील मोठ्या सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र सुरू करण्यात आली होती. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शहरातील रहिवासी सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र असणार नाहीत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र ठेवू नका, अशी शिफारस राज्य निवडणूक आयुक्तांकडून मुंबई महापालिका आयुक्तांना करण्यात आली आहे. महापालिका निवडणुकीत सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र ठेवल्यास सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांकडून मतदान प्रक्रियेत हस्तक्षेप होण्याचा धोका आहे. उमेदवार स्थानिक असल्यामुळे ओळख व समान हितसंबंध असणाऱ्या लोकांकडून मतदारांना प्रभावित केले जाऊ शकते. त्यामुळे महापालिका निवडणुका पारदर्शक होण्यासाठी सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे ठेवू नका, अशी सूचना मुंबई महापालिका प्रशासनाला केली आहे. पण, सोसायट्यांबाहेरील शाळा, महानगरपालिकेच्या किंवा अन्य सरकारी इमारती, अस्थापनांमध्ये मतदान केंद्रे सुरू करण्याची सूचना महापालिका प्रशासनाला केली असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

**अनियमितता टाळण्यासाठी खबरदारी :** महापालिका निवडणुकीत उमेदवार स्थानिक असतात. त्यामुळे ओळख आणि समान हितसंबंधी व्यक्ती आणि गटांकडून सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमधील मतदान केंद्रांमध्ये अनियमितता होण्याची शक्यता लक्षात घेऊन मुंबई पालिका प्रशासनाला सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र न ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.




---

# स्थानिक निवडणुकांतून 'पिपाणी' वगळली

## केंद्रीय निवडणूक आयोगाचा शरद पवारांना दिलासा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

शरद पवारांना केंद्रीय निवडणूक आयोगाने गुरुवारी मोठा दिलासा दिला आहे. शिवसेनेच्या पक्षचिन्हावरून वाद सुरू असतानाच शरद पवारांना पक्षचिन्हावरून मोठा दिलासा देण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला लोकसभा, विधानसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस या



चिन्हाला साधर्म्य नाव असणाऱ्या पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हामुळे फटका बसला होता. पिपाणी हे चिन्ह गोठविण्याची मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून करण्यात येत होती. अखेर निवडणूक आयोगाने ही मागणी मान्य करीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पिपाणी हे चिन्ह वगळले आहे.

### चिन्ह साधर्म्याचा फटका आता बसणार नाही

हा शरद पवारांच्या पक्षासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कोणत्याही अपक्ष उमेदवाराला पिपाणी (ट्रम्पेट) हे चिन्ह वापरता येणार नाही. त्यामुळे यापूर्वी शरद पवारांच्या पक्षाने केलेल्या दाव्याप्रमाणे त्यांना जसा या चिन्ह साधर्म्यामुळे फटका बसला, तसा कोणताही प्रकार आता होणार नाही.

### बेलापूरमध्ये निसटता पराभव

बेलापूर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार संदीप नाईक हे अवघ्या ३७७ मतांनी पराभूत झाले. त्यावेळी पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने तब्बल अडीच हजारांहून अधिक मते घेतल्याने संदीप नाईकांचा पराभव झाला असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून करण्यात आला होता.

### विधानसभेला ९ जागांवर बसला फटका

पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाला २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठा फटका बसला. या चिन्हाच्या गोंधळामुळे मतदारांनी चुकीच्या चिन्हावर (पिपाणी) मतदान केले, ज्यामुळे पक्षाच्या तुतारी चिन्हाला मतांचे विभाजन झाले आणि ९ जागांवर उमेदवार पराभूत झाल्याचे आकडेवारी दाखवत सांगण्यात आले. या जागांवर पिपाणी चिन्ह असलेल्या अपक्ष उमेदवारांना मिळालेली मते पराभवाच्या फरकापेक्षा जास्त होती, ज्यामुळे पक्षाला हानी पोहोचली.

---

| सोन्याचा भाव | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | १,२५,६४० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | १,१५,१८० रुपये |

| चांदीचा भाव | |
|---|---|
| प्रति किलो | १,७८,१०० रुपये |




शेअर बाजारात सकारात्मकता कायम असली तरी गुरुवारी जबरदस्त अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात किरकोळ वाढ झाली आहे. बाजारातील मिडकॅपसह स्मॉलकॅपमध्ये अधिक अस्थिरता नोंदवली गेल्याने बाजारात अधिक रॅली झाली नाही लार्जकॅपही (०.०१%) सपाट पातळीवर राहिली. दुसरीकडे बँक निफ्टीने नवा रेकॉर्ड केला आहे.

---

## तिन्ही सशस्त्र दलांचे संरक्षण दलप्रमुख म्हणून नियुक्ती

# घटनादुरुस्तीमुळे लष्करप्रमुख असीम मुनीर पाकिस्तानात सर्वाधिक शक्तिशाली

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पाकिस्तानच्या संसदेने २७ व्या घटनादुरुस्तीला गुरुवारी मंजुरी दिली. या घटनादुरुस्तीमुळे लष्करप्रमुख असीम मुनीर पाकिस्तानी राजकारणात सर्वाधिक शक्तिशाली झाले आहेत. लष्करप्रमुखांच्या अधिकार बहाल केल्याने सर्वोच्च न्यायालयाची अधिकार क्षमता कमी झाली आहे. पाकिस्तान ऑब्झर्व्हरच्या मते, या दुरुस्तीत ४८ कलमांमध्ये बदल प्रस्तावित आहेत. राष्ट्रीय असेंब्लीने २३४ मतांच्या बहुमताने हे विधेयक मंजूर केले. चार खासदारांनी विरोधात मतदान केले, तर सिनेटने दोन दिवसांपूर्वीच ते मंजूर केले होते. राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर तो कायदा बनेल.

मुनीर यांना तिन्ही सशस्त्र दलांचे संरक्षण दल प्रमुख (सीडीएफ) म्हणून नियुक्त केले जात आहे. ही दुरुस्ती २७ नोव्हेंबर २०२५ रोजी लागू होईल. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांना अण्वस्त्रांची कमान मिळेल. त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही ते त्यांच्या पदावर राहतील आणि त्यांना आजीवन कायदेशीर प्रतिकारशक्ती मिळेल. राष्ट्रीय असेंब्लीत पीटीआय खासदारांनी मतदानापूर्वी सभात्याग केला आणि विधेयकाच्या प्रती फाडल्या आणि त्या फेकून दिल्या. पक्षाचे प्रवक्ते झुल्फिकार बुखारी म्हणाले, संसदेने लोकशाही आणि न्यायव्यवस्था नष्ट केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून येथील घडामोडींवर भारत बारकाईने लक्ष ठेवून आहे.



**लष्कराच्या हाती अण्वस्त्र कमांड :** २७व्या घटनादुरुस्तीचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे राष्ट्रीय धोरणात्मक कमांड (एनएससी)ची निर्मिती. ही कमांड पाकिस्तानच्या अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्र प्रणालींचे निरीक्षण आणि नियंत्रण करेल. आतापर्यंत, ही जबाबदारी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय कमांड प्राधिकरण (एनसीए)कडे होती. तथापि, आतापासून, एनएससी ही जबाबदारी स्वीकारेल. एनएससी कमांडरची नियुक्ती पंतप्रधानांच्या मान्यतेने केली जाईल. ही नियुक्ती लष्कर प्रमुखांच्या शिफारसीनुसार केली जाईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हे पद फक्त लष्करी अधिकाऱ्याला दिले जाईल. यामुळे देशाच्या अण्वस्त्रांचे संपूर्ण नियंत्रण लष्कराच्या हाती येईल.

### राष्ट्रपती नाममात्र सर्वोच्च कमांडर

यामुळे देशातील लष्कराला अधिक सक्षम बनवले जाईल. घटनात्मक दुरुस्तीमुळे संविधानात लष्कराचे अधिकार कायमचे समाविष्ट होतील. याचा अर्थ असा की कोणतेही नागरी सरकार हे बदल सहजपणे उलट करू शकणार नाही. प्रत्यक्षात, राष्ट्रपतींच्या सर्वोच्च कमांडरची भूमिका केवळ औपचारिक राहील. कायदेशीर तज्ज्ञांनी याला न्यायालयीन स्वातंत्र्यावरील हल्ला म्हटले आहे.

# बिहारी वास्तव

बिहारच्या बहुचर्चित विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या (शुक्रवारी) होईल आणि उद्याच निकालही जगजाहीर होतील. नव्या प्रथेनुसार त्यापूर्वी परवाच विविध माध्यम संस्थांनी आपल्या मतदानोत्तर सर्वेक्षणांचे अंदाज जाहीर केले. सर्वच्या सर्व अंदाज राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल, असेच सांगत असून भारतीय जनता पक्ष हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष असेल, असेही भविष्य त्यांनी वर्तवले आहे. मतदानोत्तर सर्वेक्षणातल्या निष्कर्षांना बऱ्याच मर्यादा असतात. अशा सर्वेक्षणांचे निष्कर्ष कधीतरीच बरोबर ठरले आहेत. बहुतांश वेळा ते चुकीचेच ठरतात. अगदी बिहारमधल्या मागच्या दोन निवडणुकांतले अंदाज असेच चुकीचे ठरले होते. अंदाज चुकण्याचं सर्वात मोठं कारण पूर्ण शास्त्रीय प्रक्रियेचा अभाव, 'सुतावरून स्वर्ग' गाठत निष्कर्ष काढण्याची पद्धत. निवडणुकीचं साधारण वारं पाहून नजरअंदाज पद्धतीने भाकितं वर्तवण्याची सवय; पण ते मांडताना छातीठोक आत्मविश्वासाचं प्रदर्शन! भाकीत वर्तवताना आपलंच भाकीत कसं अचूक असेल हे सांगणारे, त्याचं समर्थन; आणि त्यावर कडी म्हणजे तेच सत्य मानून त्याचं विश्लेषणही करणारे प्रत्यक्ष निकाल लागल्यानंतर कुठे दिसत नाहीत. प्रत्यक्ष निकालाच्या जवळपास अंदाज आला, तर त्याची शेखी मिरवायला हे पुढे असतात; पण अंदाज फसला, तर त्याचं कारण काय, हे सांगायला अजून तरी कधीही कोणी टीव्हीच्या पडद्यावर आलेलं दिसलं नाही. बिहारमध्ये मतदारांनी काँग्रेसला खूपच दुबळं केलं आहे. महायुतीतल्या सगळ्या पक्षांना हे माहीत असूनही मोठ्या घरचं दुखणं असल्याने कोणी बोलू शकत नाही. गेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या वाईट कामगिरीने विरोधी आघाडीचा घात केला होता. यावेळीही 'महागठबंधन' म्हणून मैदानात उतरलेल्या महाआघाडीला तीच भीती आहे. बिहारचं राजकारण हे करिश्म्यावर चालणारं राजकारण नाही. जात हाच तिथल्या राजकारणाचा पाया आहे. जातीआधारित मतगठ्ठा तयार करणं आणि त्यांचा जास्तीत जास्त विश्वास संपादन करत मतपेटीपर्यंत पोहोचणं हेच बिहारच्या राजकारणाचं इंगित आहे. काँग्रेसला ते माहीत असायलाच हवं.

बिहारचं हे घट्ट जातवास्तव नवी पिढी बदलेल, असं दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत म्हटलं जातं. पण, दर निकालानंतर नव्या मतदारांनीही आपल्या राज्याचा जुनाच ट्रेंड कायम ठेवल्याचं दिसतं तेव्हां विश्लेषणाची दिशा बदलते. भारतीय जनता पक्षाने हे पूर्वीच ओळखलं आणि आपली प्रतिमा पूर्णपणे बदलली. दिवंगत कर्पुरी ठाकूर यांच्या दोन शिष्यांपैकी नितीशकुमार यांना लालूप्रसाद यांच्यापासून बाजूला करून त्यांनी त्याची सुरुवात केली. दिवंगत ठाकूर यांनी इतर मागासवर्गीय आणि मागास जातींची बसवलेली भक्कम घडी लक्षात घेऊन त्यांनी ठाकूर यांना मरणोत्तर 'भारतरत्ना'ने गौरवलंच; शिवाय त्यांना `जननायक' ही उपाधीही बहाल केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भाषणांतूनही कर्पुरी ठाकूर यांचं सन्मानपूर्वक स्मरण केलं. बिहारमध्ये गेल्यानंतर तर ते ठाकूर यांच्या पुतळ्याला वंदन केल्याशिवाय राहत नाहीत. त्यांचे प्रयत्न प्रामाणिक आहेत, पक्षाला व्यापक जनाधार मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पक्षाचा मतदार तयार करण्याचा, पक्षाला सामाजिक आधार मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पक्षाची व्यूहरचना ठरवणाऱ्यांची दिशाही बरोबर आहे; पण तरीही त्यांना अजून 'स्वतःचा चेहरा' मिळेना ही वस्तुस्थिती आहे. अंशतः स्मृतीभंश झालेल्या नितीशकुमार यांचा चेहराच त्यांना आजही पुढे करावा लागतो आहे. भाजप यावेळी तरी आपला चेहरा घेऊन निवडणुकीत उतरेल, असं वाटत होतं. पण तेवढा भरवसा ठेवावा, अशा चेहऱ्याच्या शोधात पक्ष अजूनही आहे, असंच दिसतं. बिहारमधल्या मागास जाती १९७० च्या दशकात राजकीयदृष्ट्या जागृत झाल्या आणि त्यांनी आपली राजकीय फळी बनवली. उत्तर भारतात फक्त बिहारमध्येच ही प्रक्रिया घडली आणि स्थिरावलीही. कर्पुरी ठाकूर यांनी १९७८ मध्ये तिथे इतर मागासवर्गीय जातींना स्वतंत्र आरक्षण दिलं. देशात मंडल आयोगाच्या शिफारशी लागू होण्याआधी सुमारे तेरा वर्षे घडलेल्या या सामाजिक बदलाचा परिणाम तिथल्या राजकारणावर फार खोलवर झाला आहे. या प्रक्रियेतून घडलेल्या प्रादेशिक पक्षांच्या नेतृत्वाखालीच तिथे राष्ट्रीय पक्षांना आपलं राजकारण करावं लागतं आहे. यावेळी भाजपला सर्वाधिक जागा मिळण्याचा अंदाज असल्याने तो पक्ष निकालानंतर काय भूमिका घेतो, याविषयी म्हणूनच सर्वात जास्त उत्सुकता आहे.

'लाडकी बहीण' चा यशस्वी फॉर्म्युला यावेळी बिहारमध्येही वापरला गेला आहे. निवडणुकीआधी सरकारने आयकर न भरणाऱ्या सर्व महिलांच्या बँक खात्यात दहा हजार रुपये एकरकमी पाठवून दिले आहेत. महिलांना उद्योजक बनवण्यासाठी हे बीज भांडवल आहे, असं सरकारने म्हटलं आहे. त्यामुळे, अन्य राज्यांप्रमाणे ही मासिक अनुदान योजना नसावी, असं वाटतं. पण, सांगता येत नाही. गरज वाटलीच, तर बिहार सरकार या बीज भांडवलात वेळोवेळी अधिक भर टाकू शकतं!! या दहा हजार रुपयांनी आणि निवडणुकीच्या काळात मिळालेल्या आणखीही 'आश्वासनां'नी यावेळी बिहारच्या निवडणुकीत चांगलेच रंग भरले होते. परिणामी मतदानाचे यापूर्वी न दिसलेले आकडे गाठले गेले. महिलांनी रांगा लावून आवर्जून मतदान केलं. ही सगळी चिन्हं विद्यमान सरकारसाठी अनुकूल असल्याने यावेळी पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीलाच बहुमत मिळेल, असं म्हटलं जातं आहे. खेड्यापाड्यात महिलांमध्ये 'मोदीजीने भेजे हुए पैसे' अशी भावना पसरल्याने भाजपला त्याचा जोरदार फायदा होईल. पक्ष पहिल्या क्रमांकावर असेल, असं मानलं जातं आहे. मतदानोत्तर सर्वेक्षणाचा दावा करणाऱ्यांनी या 'हवे' चीच री ओढली आहे. निवडणुकीआधी राष्ट्रीय जनता दलाच्या तेजस्वी यादव यांच्याविषयी बरंच बोललं जात होतं. पण, पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा या दोघांनीही प्रचारादरम्यान त्यांच्यावर असा काही हल्ला चढवला, की ते मागे पडले. तेजस्वी नव्या पिढीच प्रतिनिधित्व करत असले, आधुनिक भाषा बोलत असले तरी ते लालूप्रसाद यांचे चिरंजीव आहेत, ही बाब कधीच पुसली जाणार नाही. बिहारमधल्या उच्च जाती त्यामुळे त्यांना आधार द्यायला सहजासहजी तयार होणार नाहीत. लालूप्रसाद-राबडीदेवींवर असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचं ओझं आपोआपच त्यांच्या पाठीवर येऊन पडतं. महाआघाडीने त्यांनाच मुख्यमंत्री पदाचा चेहरा म्हणून निवडणुकीत पुढे केलं आहे. जेव्हां निकाल येतील आणि 'महाआघाडी'ला फटका बसेल, तेव्हा त्याचा सर्वात मोठा धक्का तेजस्वी यांनाच बसेल. 'महाआघाडी' राखणंही कठीण होऊन जाईल. बिहारच्या निकालाने देशातल्या भाजपानुकूल वातावरणाला आणखी बळ मिळेल!

# जिल्हा परिषदेचे आधुनिक प्रशासनिक केंद्र

**मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद इमारतीचा भव्य लोकार्पण सोहळा गुरुवारी (दि. १३) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. अत्याधुनिक सुविधांनी सजलेली ही इमारत जिल्हा परिषदेच्या नावलौकिकात भर घालणार आहे. आतापर्यंत इमारतीसाठी सुमारे ८२ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. येत्या काळात प्रशासनाच्या कामकाजात अधिक कार्यक्षमता आणि पारदर्शकता येण्यास मदत करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. एक नवे आधुनिक प्रशासनिक केंद्र म्हणून उदयास येणार आहे.**





वार्तापत्र
उत्तर महाराष्ट्र

नाशिक जिल्हा परिषदेची इमारत १९४० साली बांधण्यात आली होती. १९६२ मध्ये जिल्हा परिषदेचे कामकाज सुरू झाले. तेव्हापासून आजवर अनेक विभाग, शाखा आणि कर्मचारीसंख्या वाढल्यामुळे त्या इमारतीत जागेची कमतरता भासू लागली होती. कार्यालयांची गर्दी, पार्किंगची मर्यादित व्यवस्था आणि जुनाट बांधकाम यामुळे कामकाजात अडथळे निर्माण होत होते. त्यामुळे नवी, प्रशस्त आणि आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त अशी इमारत उभी करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने होत होती. ही इमारत नाशिक जिल्हा परिषदेच्या प्रशासनाला डिजिटल, सुसंवादित आणि कर्मचाऱ्यांसाठी अनुकूल वातावरण प्रदान करणार आहे. जुन्या इमारतीच्या पार्श्वभूमीवर २०१८ साली जिल्हा परिषद प्रशासनाने नवीन इमारतीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला. त्यानंतर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर या महत्त्वाच्या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. नूतन इमारतीसाठी योग्य जागा निश्चित करण्यात आली आणि त्वरित बांधकामाला प्रारंभ झाला. गेल्या साडेतीन वर्षांपासून जिल्हा परिषदेत प्रशासक असून ते राज्य शासनाशी समन्वय साधत काम वेगाने पुढे नेण्यात आले. अनेकांच्या मते, या काळात लोकप्रतिनिधी आणि सभागृह अस्तित्वात असते, तर कदाचित मंजुरी आणि बांधकाम प्रक्रियेला अधिक गती प्राप्त झाली असती.

नवीन इमारत अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, एकूण सहा मजल्यांची आहे. यापैकी सध्या पहिले तीन मजले पूर्ण झाले आहेत आणि लोकार्पणानंतर ते वापरासाठी खुले केले जाणार आहेत. उर्वरित तीन मजल्यांवरील काम जलद गतीने सुरू आहे आणि पुढील काही महिन्यांत पूर्ण करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. इमारतीत प्रशासकीय विभाग, बैठकीसाठी स्वतंत्र सभागृह, प्रशिक्षण कक्ष, डिजिटल माहिती केंद्र, तसेच कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या नूतन इमारतीमुळे जिल्हा परिषदेचे कामकाज अधिक सुव्यवस्थित, नागरिकाभिमुख आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत होईल. जिल्हा प्रशासन आणि जनतेमध्ये थेट संवाद सुलभ होईल. तसेच, विभागीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना उत्तम कार्यपरिसर मिळाल्याने कार्यक्षमतेत वाढ होईल. लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, नाशिककरांसाठी हा दिवस ऐतिहासिक ठरणार आहे. आधुनिकतेकडे वाटचाल करणारा आणि लोकसेवेसाठी समर्पित असा, नव्या इमारतीच्या माध्यमातून नाशिक जिल्हा परिषद प्रशासनाचा नवा अध्याय सुरू होत आहे.

नाशिक जिल्हा परिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारत अनेक वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. त्यात प्रामुख्याने नूतन प्रशासकीय इमारत ही आधुनिक व सर्व सुविधा-संपन्न इमारत आहे. या इमारतीच्या बांधकामात प्रशासकीय सोय, कर्मचाऱ्यांचा सोयीचा कार्यानुभव आणि नागरिकांसाठी सुलभ सेवा या तीनही बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी नरेश गीते यांनी अर्थात २०१८ मध्ये नूतन इमारतीसाठी पाठपुरावा केला. त्यानंतर एस. भुनेश्वरी, लीना बनसोड आणि या पूर्वीच्या सीईओ आशिमा मित्तल या सर्वांनाच या कामाचे श्रेय जाते. मित्तल यांनी शेवटच्या टप्प्यात राज्य शासनाकडे चांगलाच पाठपुरावा केला आहे. त्याचा परिपाक म्हणून काम प्रारंभी संथ; परंतु नंतर जलद गतीने इमारतीचे काम झाले. त्याचबरोबर त्यावेळच्या जिल्हा परिषद अध्यक्षा शीतल सांगळे आणि बाळासाहेब क्षीरसागर यांचा देखील या कामात खारीचा वाटा आहे. आता इमारत पूर्ण झाली असून आज लोकार्पण सोहळा होत आहेत; परंतु, या अत्याधुनिक इमारतीमध्ये प्रशासनाने तेवढेत पोटतिडकीने, यापेक्षा अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त आणि पारदर्शक पद्धतीने कामकाज करेल. एक सेवा केंद्र म्हणून याचा राज्य आणि देशात नावलौकिक होईल. या इमारतीमधून ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न लवकर सुटतील अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करू या.

**इमारतीची प्रमुख वैशिष्ट्ये अशी...**

१. आधुनिक सुविधा असलेली प्रशासकीय रचना, प्रशस्त कार्यालयीन जागा, सुसज्ज सभागृहे आणि नागरिकांसाठी सुलभ प्रवेशद्वार आहेत.
२. सौंदर्यपूर्ण परिसर, इमारतीच्या परिसरात आकर्षक लॉन्स व बाह्य रस्त्यांची व्यवस्था, ज्यामुळे संपूर्ण संकुलाला एक भव्य व देखणा स्वरूप लाभले आहे.
३. कर्मचाऱ्यांसाठी मनोरंजन कक्ष, कामाच्या ताणातून दिलासा मिळावा म्हणून टेबल टेनिस, ट्रेड मिल आणि इनडोअर गेम्ससाठी विशेष कक्षाची निर्मिती.
४. सुविधायुक्त सेवा विभाग, इमारतीतच बँक व एटीएम सुविधा, तसेच कर्मचाऱ्यांसाठी कॅन्टीनची व्यवस्था.
५. उत्तम दर्जाचे बांधकाम, वास्तुविशारद व तांत्रिक पथकाच्या देखरेखीखाली उच्च गुणवत्तेच्या साहित्याचा वापर.
६. अत्याधुनिक हिरकणी कक्षाची स्थापना.



मंत्री भुजबळ, शीतल सांगळे, मनीषा पवार यांचे योगदान तत्कालीन बांधकाम सभापती मनीषा पवार यांनी या इमारतीचा प्रस्ताव मांडून आराखडा तयार करून घेतला. त्यावेळच्या अध्यक्ष शीतल सांगळे यांनी पाठपुरावा केला. काही दिवसांपुरते ग्रामविकास मंत्री झालेले छगन भुजबळ यांनी या इमारतीला प्रशासकीय मान्यता दिली. त्यांच्याच हस्ते या इमारतीचे भूमिपूजन देखील झाले होते. वर्क ऑर्डर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे यांनी दिली व आताही ते काम त्यांच्याच काळात झाले आहे.

**- धनंजय बोडके**

# नियोजनबद्ध आत्मघाती हल्ला

**दिल्लीच्या लाल किल्ल्यानजीक घडवलेला बॉम्बस्फोट आणि त्यात वापरलेली स्फोटके पाहता हे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने घडवलेले दहशतवादी कृत्य मानता येते. 'जैश-ए-मोहम्मद' या अतिरेकी संघटनेशी संबंधित दहशतवाद्यांनी देशाच्या राजधानीमध्ये स्फोट घडवून सुरक्षा यंत्रणांना आव्हान दिले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या सुमारास स्फोट घडवून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे.**



यंदा २२ एप्रिलला पाकिस्तानी दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पुलवामा येथे केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला. भारताने ६ मेच्या रात्रीपासून ४ दिवस पाकिस्तानमध्ये घुसून 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबवली. 'जैश-ए-मोहंमद'सह अन्य दहशतवाद्यांचे तळ उद्‌ध्वस्त केले. शंभरहून अधिक दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. त्यातही 'जैश'चा म्होरक्या मसूद अजहरच्या कुटुंबाचा खात्मा करण्यात आला. त्यामुळे चवताळलेली 'जैश' स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये नाक कापल्यानंतर पाकिस्तानमधील दहशतवादी गट काहीतरी करणार हे अपेक्षित होतेच. त्यामुळे तर 'जैश'ने आता महिलांची दहशतवादी ब्रिगेड स्थापन करून भारताविरोधात वापरण्याचे ठरवले होते. अलीकडेच 'जैश'चा म्होरक्या मसूदने भारतात दहशतवादी कारवाया करण्याची धमकी दिली. त्यानंतर भारतातील तपास यंत्रणा सक्रिय झाल्या. जम्मू-काश्मीर, फरिदाबाद, लखनऊ, अहमदाबाद येथून काहीजणांना अटक केली. यातील बहुतेकांचा 'जैश'शी संबंध आहे. भारताचा मानबिंदू असलेल्या लाल किल्ला परिसरातील मेट्रो स्टेशनजवळ अतिशय नियोजनबद्धतेने स्फोट घडवत सामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण करता आली हे महत्त्वाचे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय तपास संस्था, दिल्ली पोलीस, केंद्रीय अन्वेषण विभाग, फॉरेन्सिक यंत्रणा तसेच अन्य घटकांशी चर्चा करून दिल्लीच्या स्फोटाचे मूळ शोधायला सुरुवात केली. फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांनी घटनास्थळावरून पुरावे गोळा केले. दिल्ली पोलीस, 'एनआयए', 'एनएसजी' आणि 'एफएसएल'च्या पथकांनी तपास सुरू केला. घटनास्थळाभोवती असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. कोणत्याही दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली नसली, तरी पूर्वी अटक केलेल्यांच्या तपासातून त्यांचा 'जैश'शी आणि अटक केलेल्यांचा दिल्ली बॉंबस्फोटाशी संबंध जोडला जात आहे. स्फोटानंतर राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील सुरक्षा संस्थांना सतर्क करण्यात आले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) दिल्ली मेट्रो, लाल किल्ला, सरकारी इमारती आणि इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळासह सर्व संवेदनशील ठिकाणी सुरक्षा कडक केली. संवेदनशील प्रतिष्ठानांवर अतिरिक्त दल तैनात करण्यात आले असले, तरी हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. कोणत्याही दहशतवादी घटनेनंतर देशात काही दिवस सतर्कता बाळगली जाते आणि नंतर दुर्लक्ष केले जाते.

दरम्यान, केंद्रीय एजन्सींसह हरियाणा आणि उत्तर प्रदेश पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'अन्सार गजवत-उल-हिंद'शी संबंधित 'एका व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करण्यात आला. तो काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये पसरला होता. अटक केलेला संशयित दहशतवादी डॉ. मुझम्मिल अहमद गनी उर्फ मुसैब याच्या तपासातून पोलीस यंत्रणेला मिळालेली माहिती धक्कादायक आहे. त्याच्याशी संबंधित महिला डॉ. शाहीन हिला अलीकडेच लखनऊमध्ये अटक करण्यात आली. तिच्या कारमधून एके-४७ रायफल जप्त करण्यात आली. यापूर्वी, अनंतनाग येथील रहिवासी डॉ. आदिल अहमद याला ७ तारखेला सहारनपूरमध्ये अटक करण्यात आली. तो अनंतनाग येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत होता. आरिफ निसार दार, यासिर-उल-अशरफ आणि मकसूद अहमद दार उर्फ शाहिद हे नौगाम, श्रीनगरचे, मौलवी इरफान अहमद शोपियानचा, जमीर अहमद अहंगर हा गंदरबलचा, डॉ. मुझम्मिल अहमद गनई आणि डॉ. आदिल हे कुलगाममधील नागरिक आहेत. स्फोट झालेल्या कारच्या विक्रीचे टप्पे पाहिल्यास हे कनेक्शन पुलवामापर्यंत पोहोचते. या प्रकरणात डॉ. उमरसह आणखी काहीजणांना अटक होण्याची शक्यता आहे. मुझम्मिल आणि आदिलच्या फोनवर अनेक पाकिस्तानी नंबर सापडले. मुझम्मिल अल फलाह विद्यापीठात डॉक्टर म्हणून काम करत होता. २,९०० किलो स्फोटकांपैकी ३६० किलो स्फोटके आणि काही शस्त्रे तसेच दारूगोळा डॉ. मुझम्मिलच्या फरिदाबादमधील भाड्याच्या घरातून जप्त करण्यात आला. फतेहपूर तागा गावातील एका खोलीतून २,५५० किलो अमोनियम नायट्रेट जप्त करण्यात आले. मुझ्झमिलने श्रीनगरमध्ये 'जैश-ए-मोहम्मद'च्या समर्थनार्थ पोस्टर्स लावली होती. दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करून, सुरक्षा यंत्रणांनी 'जैश-ए-मोहम्मद' आणि भारतातील 'इसिस'चा गट 'अन्सार गजवत-उल-हिंद'च्या धोकादायक योजना उधळून लावल्या; परंतु दिल्लीच्या कटाचा सुगावा लागला नाही.

जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचा वापर शेकडो अत्यंत शक्तिशाली आयईडी (इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइसेस) बनवण्यासाठी केला गेला असता. अमोनियम नायट्रेट हे एक पांढरे, पावडरसारखे रसायन आहे. ते फार महाग नसते. त्यात डेटोनेटर, बॅटरी आणि टायमर जोडल्याने एक घातक बॉम्ब तयार होतो. डॉ. मुझम्मिल अहमद गनी उर्फ मुसैब याने चौकशीदरम्यान कबुली दिली. त्याच्या पाकिस्तानी हँडलरने त्याला सांगितलं होतं, की या वेळी स्फोट इतका भयानक असेल, की मृतांची संख्या हजारोंमध्ये जाईल. दहशतवादी संघटनेची ही धोकादायक योजना अमलात आणण्यासाठी २९०० किलो स्फोटके फरिदाबादला पाठवण्यात आली होती. फरिदाबादमधील यात्रेला लक्ष्य करण्याचा दहशतवाद्यांचा कट होता. त्यात डॉ. शाहीन सहभागी होती. या यात्रेला सुमारे ४० हजार लोक उपस्थित होते. यात्रेला लक्ष्य करण्यापूर्वी संशयित दहशतवादी मुसैबला अटक करण्यात आली. त्यामुळे त्याचा कट उधळला. डॉ. उमर त्यांच्या कटात सहभागी होता. त्याचा संबंध दिल्ली बॉम्बस्फोटाशी जोडला जात आहे. तो अजूनही तपास यंत्रणांना सापडलेला नाही.

२०१९ मध्ये दहशतवाद्यांनी पुलवामा येथे अशाच प्रकारच्या स्फोटकांनी भरलेल्या वाहनाचा स्फोट केला. त्यात ४० सैनिकांचे बलिदान झाले. कारमध्ये झालेल्या स्फोटाच्या कारणाबद्दल अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. या घटना स्थानिक पातळीवर घडल्या होत्या की त्यांचा देशाबाहेर संबंध होता? उमर मोहम्मदच दुर्घटनाग्रस्त आय-२० कार चालवत असल्याचा संशय आहे. पोलीस आता कारच्या ड्रायव्हरच्या सीटवर सापडलेल्या मृतदेहाची डीएनए चाचणी करत आहेत. दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाला सीसीटीव्ही फुटेजमधून अनेक महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. दहशतवादी गटांकडून वापरली जाणारी ही एक प्रसिद्ध कार्यपद्धती आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या फॉरेन्सिक आणि दहशतवादविरोधी पथकांना काही आश्चर्यकारक गोष्टी आढळल्या. अशा बॉम्बस्फोटांनंतर जमिनीवर एक खड्डा तयार होतो आणि शार्पनेल विखुरलेले असते; परंतु येथे असे काहीही आढळले नाही. आरडीएक्स आणि अमोनियम नायट्रेटचे मिश्रण किंवा अत्यंत ज्वलनशील रसायन वापरण्यात आल्यामुळे खड्डा पडला नसावा, असा तज्ज्ञांचा अंदाज होता. हा आत्मघातकी हल्ला होता का याचाही तपास पोलीस करत आहेत. तथापि, या सिद्धांतावर प्रश्न उपस्थित करणारी एक बाब म्हणजे स्फोटाच्या वेळी कारमध्ये तीन लोक होते. सहसा आत्मघातकी हल्ल्यांमध्ये फक्त एक किंवा दोन लोक असतात. लाल किल्ल्याअगोदर ही कार सुन्हेरी मशिदीजवळ गाडी दिसली. ती दोन तास तिथेच राहिली. त्यानंतर ती लाल किल्ल्याकडे नेण्यात आली. बहुतेक लोकांच्या मृतदेहावर शार्पनेलचे कोणतेही चिन्ह नव्हते. एकंदरीत, दिल्लीच्या घटनेमागे मोठे षडयंत्र असून त्यातून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा हेतू होता, हे स्पष्ट दिसते.

**- भास्कर निघूट**
**(लेखक वायुदलात वरिष्ठ संशोधक होते)**

## दहशतवादाचा हल्ला कटकारस्थानाचा

दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्टेशनबाहेर झालेला स्फोट हा दहशतवादी हल्लाच आहे. एका कारमध्ये स्फोटके ठेवून स्फोट घडविण्यात आला होता. या स्फोटाने दिल्ली नव्हे, तर राजधानी मुंबईसह देशातील प्रमुख शहरांमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला असून अंतर्गत सुरक्षा धोक्यात असल्याचे या स्फोटातून दिसून येत आहे. सर्जिकल स्ट्राईक आणि ऑपरेशन सिंदूरनंतर दहशतवादी भारतात घुसलेच कसे? हा अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न आहे. देशातील अनेक राज्यांना दहशतवादाचा धोका निर्माण झाला आहे. सीमा ओलांडून भारतात दहशतवादी येतात आणि वेगवेगळ्या राज्यात जाऊन नेटवर्क उभारतात, ही भारतासाठी अत्यंत धोकादायक बाब आहे. ही घटना अपघात होता की कट रचला गेला याचा तपास सुरक्षा यंत्रणा करत आहेत. मात्र, हा हल्ला पुलवामा हल्ल्याची आठवण करुन दहशतवाद्यांनी घडविला असल्याचे स्पष्ट होत आहे. फुलवामा, पहलगामनंतर दहशतवाद्यांनी दिल्लीला लक्ष्य करून आत्मघातकी हल्ला केला. त्यामुळे ही घटना खूपच भीषण आहे.

**- कमलाकर जाधव,** बोरिवली

## कधी थांबणार बिबट्यांचे हल्ले?

बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे स्वतःच्या संरक्षणासाठी जुन्नरमध्ये शेतकरी महिलांनी गळ्यात टोकदार खिळे असलेला पट्टा घातलेला व्हिडीओ वायरल झाला असतानाच कोल्हापूर शहरात भरवस्तीत घुसलेल्या बिबट्याने दहशत निर्माण करून घातलेल्या धुमाकुळाची बातमी येऊन थडकली. खरे तर आता अशा बातम्या नेहमीच्याच झाल्या असून बिबट्यांची वाढती संख्या आणि त्यांचे गावाच्या, शहरांच्या वेशीवर येऊन मानवी वस्तीवरील हल्ले आणि त्यातून नागरिकांचा जीव जाणे हा चिंतेचा विषय ठरला आहे. बिबट्याची समस्या केवळ पुणे जिल्ह्यापुरती सीमित राहिली नसून संपूर्ण राज्यभरात अनुभवास येत आहे. एकीकडे सिंचनामुळे उसाचे क्षेत्र वाढल्याने आणि त्याचवेळी वनक्षेत्र घटल्याने बिबट्यांची उसाचा सहारा घेतला आहे. गाई-गुरे, शेळ्या-मेंढ्या, कोंबड्या, मोकाट कुत्री यांसारख्या खाद्यामुळे मानवी वस्तीत बिबट्यांचा वावर वाढला आहे. मानवी वस्तीवर होणाऱ्या बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना वाढल्या असताना हे रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

जनसंवाद

## भाईंदर पूर्वला पोस्ट ऑफिस हवे

पूर्वी भाईंदर पूर्वकडे बी. पी. रोडवर एका मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतीत अगदी अडचणीच्या जागेत पोस्ट क्रमांक ४०१ १०५ होते. नागरिकांच्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारीनंतर ते पोस्ट कार्यालय आर.एन.पी. पार्क भाईंदर (पूर्व) येथील ऐसपैस जागेत हलविण्यात आले. नवघर , बी. पी. रोड, इंद्रलोक, गोल्डननेस्ट परिसरातील नागरिकांना ते लांबच पडते. परंतु अलीकडे कोणतीही पूर्वसूचना न देता आर. एन. पी. पार्क येथील पोस्ट कार्यालय भाईंदर पश्चिमेला स्थलांतरित करण्यात आल्यामुळे भाईंदर पूर्वेकडील नागरिकांना गैरसोयीचे झाले आहे. तरी पोस्ट कार्यालय पुन्हा पूर्वेकडे आणावे.

**- अनंत आंगचेकर,** भाईंदर

## 'वंदे मातरम्' म्हटले जावे

'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या वादाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'वंदे मातरम्' म्हणणे बंधनकारक असल्याची घोषणा केली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, जर देशाच्या अखंडतेवर आघात करण्यासाठी कुणी महंमद अली उदयास आला, तर त्याला दफन केले जाईल. आज भाषा आणि जात यांच्या नावाखाली फाळणी करण्याचा प्रयत्न होत आहे; परंतु कोणताही धर्म किंवा मत राष्ट्रापेक्षा मोठे असू शकत नाही.' संविधानाने समस्त भारतीयांना उपासना आणि धर्मस्वातंत्र्य दिले असले, तरी जिथे राष्ट्राचा विषय येतो तिथे धार्मिक अधिकार वगैरे दुय्यम ठरतात. राष्ट्रहिताच्या निर्णयात धार्मिक बाबींनी नाक खुपसू नये हा सरळ साधारण नियम आहे. असे असताना काही कट्टरपंथीय नेते 'वंदे मातरम्'ला नाहक विरोध करताना दिसत आहेत. देशासाठी सर्वस्व बहाल करणाऱ्या क्रांतिकारकांना संजीवनी देण्याचे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळात 'वंदे मातरम' या द्वी अक्षरी मंत्राने केले आहे. हीच खरी क्रांतिकारकांच्या प्रति श्रद्धांजली असेल.

**- मोक्षदा घाणेकर,** काळाचौकी

## भटक्या कुत्र्यांची नसबंदी करा

सध्या भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून मोठ्यांपासून लहानांपर्यंत अनेकजण कुत्र्यांच्या हल्ल्यात जायबंदी झालेत. विविध परिसरात या भटक्या कुत्र्यांची दहशत आहे. कचराकुंड्या, उकिरडा, रेल्वे स्थानक, मंदिर परिसर, शाळा, पटांगण, सोसायटी, सार्वजनिक ठिकाणांचा भटक्या कुत्र्यांनी ताबा घेतल्याचे दिसून येते. यामुळे नागरिक आणि शालेय विद्यार्थी कमालीचे त्रस्त असून पालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही या कुत्र्यांचा बंदोबस्त होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांच्या वतीने कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त न केल्यास हे भटके कुत्रे पालिका मुख्यालयात सोडून आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला जात असला तरी याकडे दुर्लक्ष केले जाते. रस्त्याने जाणाऱ्या लहान मुलांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडल्या असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सर्वोच्च न्यायालयाने घेतलेला निर्णय स्वागतार्ह असला तरी तसे होईल असे वाटत नाही. रिकाम्या जागेत एकत्रित करून अशा प्राण्यांची नसबंदी केली तर थेडा फरक पडेल असे वाटते. तरी असल्या भटक्या कुत्र्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

**- राजू जाधव,** मांगूर जि.बेळगांव

## रुग्णालयांच्या कारभाराची चौकशी व्हावी

मुंबई महापालिकेच्या परळ येथील केईएम रुग्णालयाचा ढिसाळ कारभार समोर आला आहे. गेली अनेक वर्षे रुग्णांना ताटकळत ठेवणे, रुग्णांच्या अंतर्गत चाचण्या न करता कमिशनसाठी खासगी लॅबमध्ये पाठवणे आदी प्रकार सुरू आहेत; परंतु शासनाने दुर्लक्ष करून कारवाईचे कोणतेही आदेश न दिल्याने रुग्णालयातील ढिसाळ व गलथान कारभार अधिक प्रमाणात वाढल्याचे चित्र आहे. पालिकेने तब्बल ५५६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असताना पुरेसे मनुष्यबळ तसेच आवश्यक यंत्रणा कार्यान्वित झालेली नसल्याचा प्रकार नुसता भोंगळ कारभाराचा नमुना नसून दलालीच्या विळख्यात रुग्णालय प्रशासन अडकल्याचा दाट संशय येतो. रुग्णालयाच्या या संपूर्ण कारभाराची त्वरित चौकशी झाली पाहिजे आणि दोषींना कठोरात कठोर शिक्षा झालीच पाहिजे.

**- चंद्रशेखर कमळाकर दाभोळकर,** भांडुप

## पासवर्ड अधिक सुरक्षित हवा

आजच्या डिजिटल युगात ईमेल, विविध संरक्षित वेबसाइट, समाजमाध्यमापासून ते ऑनलाइन शॉपिंग, बँकिंगपर्यंत सर्वच ठिकाणी वापरकर्त्यांची माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी 'पासवर्ड' हा परवलीचा शब्द आवश्यक बनला आहे. इंग्लंडमधील मेडस्टोन शहरातील 'कॉम्पॅरिटेक' या ग्राहक-केंद्रित सॉफ्टवेअर कंपनीने २०२५ मध्ये लीक झालेल्या २ अब्जांहून अधिक खात्यांच्या पासवर्डच्या केलेल्या विश्लेषणानुसार जगातील ७६ लाख वापरकर्त्यांनी '१२३४५६' हा एकच पासवर्ड वापरला होता. त्यानंतर ३६ लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी '१२३४५६७८' हा पासवर्ड आणि २८ लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी '१२३४५६७८९' हा पासवर्ड वापरला होता. ३८.६ टक्के पासवर्डमध्ये '१२३'ही संख्या होती, तर २ टक्के पासवर्डमध्ये '३२१' ही उतरती संख्या होती. १२ वर्णांपेक्षा कमी लांबीचे पासवर्ड ६५.८ टक्के, तर सुरक्षित मानले जाणारे १६ वर्ण किंवा त्याहून अधिक लांबीचे पासवर्ड केवळ ३.२ टक्के इतके होते. अशावेळी सायबर सुरक्षेचा धोका लक्षात घेऊन आपली डिजिटल माहिती अधिक सुरक्षित ठेवण्यासाठी वापरकर्त्यांनी मजबूत पासवर्ड बनवताना लहान मोठी अक्षरे, संख्या आणि विरामचिन्हे घेऊन कमीत कमी १२ किंवा त्याहून अधिक वर्णांचा सुरक्षित पासवर्ड बनवणे उचित होईल.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

## राशिभविष्य
गुरुवार,१३ नोव्हेंबर २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती कार्तिक कृष्ण नवमी शके १९४७. चंद्र नक्षत्र मघा योग ब्रह्मा नंतर ऐद्र, चंद्र राशी सिंह, भारतीय सौर २२ मार्गशीर्ष शके १९४७ गुरुवार, दि.१३ नोव्हेंबर २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.४४, मुंबईचा सूर्यास्त ६.००, मुंबईचा चंद्रोदय १.४५, मुंबईचा चंद्रास्त १.४८, पीएम राहू काळ १.४७ ते ३.११. पारशी तीर मासारंभ, शुभ दिवस.

**|| भविष्य ||**

**मेष** : कुटुंबातील व्यक्तींची सामंजस्याने वागण्याची गरज राहील.

**वृषभ** : अपेक्षित यश साध्य होईल.

**मिथुन** : दिवस आनंदात व उत्साहात जाईल.

**कर्क** : भाग्याची साथ मिळेल.

**सिंह** : व्यवसाय-धंद्यात प्रगती होऊन उलाढाल वाढेल.

**कन्या** : एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन होईल.

**तूळ** : सुखद वार्ता मिळतील.

**वृश्चिक** : सकारात्मक विचारांच्या व्यक्तींच्या सहवासात राहाल.

**धनू** : जुनी मित्रमंडळी भेटतील. दिवस आनंदात जाईल.

**मकर** : प्रश्न सुटल्यामुळे आनंदी राहाल.

**कुंभ** : खरेदी होऊ शकते.

**मीन** : नवीन उपक्रम राबवू शकाल.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## क्रीडा



# भारत-दक्षिण आफ्रिका दुसरा कसोटी सामना सकाळी ९ वाजेपासून

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या भारत दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये मालिका खेळवल्या जातील. येत्या १४ नोव्हेंबरपासून भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेला सुरूवात होणार आहे, तर दुसरा सामना २२ नोव्हेंबरपासून दुसरा कसोटी सामना गुवाहाटीत खेळवला जाईल.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील मालिकेतील पहिला सामना वेळापत्रकानुसार कोलकाता येथे होईल. गुवाहाटीमधील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या वेळेत आता बदल करण्यात आला आहे. बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांनी म्हटलं आहे की, गुवाहाटी हे ईशान्य भारतात आहे आणि हिवाळ्यात तिथे सूर्य लवकर उगवतो आणि मावळतो. या कारणामुळे दुसरा कसोटी सामना अर्धा तास लवकर सुरू होणार आहे. म्हणजेच पहिल्या दिवशी सामन्याची नाणेफेक सकाळी ८.३० वाजता होईल आणि इतर सर्व दिवशी खेळ सकाळी ९ वाजता सुरू होईल.



# राग, निराशा अन् हतबलता वाढतेय!
## इंडियन सुपर लीग सुरू करण्यासाठी फुटबॉलपटूंची विनंती



◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

भारतातील सर्वात मोठी व्यावसायिक फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंडियन सुपर लीगला (आयएसएल) यंदाच्या मोसमात अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. यामुळे फुटबॉलपटू, प्रशिक्षक, चाहत्यांचे नुकसान होत आहे. राग, निराशा अन् हतबलता वाढत चालली आहे. याच पार्श्वभूमीवर आयएसएल ही स्पर्धा पुन्हा सुरू करण्याची आर्त हाक भारतातील फुटबॉलपटूंकडून मारण्यात आली आहे.

अखिल भारतीय फुटबॉल संघटना व रिलायन्स यांच्या पुढाकाराने आयएसएल ही स्पर्धा १५ वर्षे सुरू होती, मात्र कराराचे नूतनीकरण करण्यात आले नाही. त्यामुळे यंदा अद्याप या स्पर्धेचा श्रीगणेशा झालेला नाही. गेल्या आठवड्यात अखिल भारतीय फुटबॉल महासंघाकडून सांगण्यात आले की, आयएसएलच्या व्यावसायिक हक्कांसाठी मागवलेल्या प्रस्तावांना कोणतीही बोली मिळालेली नाही. ही बोली १६ ऑक्टोबरला मागवली होती. तसेच आगामी करार १५ वर्षांचा असणार होता.

भारतीय फुटबॉल संघातील स्टार खेळाडू संदेश झिंगन या वेळी भावुक होऊन म्हणाला की, "खेळाडू, प्रशिक्षक, चाहत्यांना स्पर्धा केव्हा सुरू होते याची प्रतीक्षा आहे. आम्ही खूप मेहनत केली. खूप काही दिले आहे. पण मोसम न खेळताच संपत चालला आहे." पुढे तो सांगतो की, "संपूर्ण भारतीय फुटबॉल व्यवस्था अनिश्चिततेत आहे. स्वप्ने थांबली आहेत. भविष्य प्रश्नचिन्हाखाली आहे. प्रत्येक दिवस आम्ही थांबतो आहोत. भारतीय फुटबॉल पूर्वपदावर आणण्यासाठी कृतीची वेळ आली आहे." सुनील छेत्री व गुरप्रीत सिंग संधू या फुटबॉलपटूंनीही सोशल माध्यमावर आपले मत व्यक्त केले आहे. ते सांगतात की, "आम्ही आयएसएलमध्ये खेळणारे व्यावसायिक फुटबॉलपटू एकत्र आलो आहोत. आमचा एकच संदेश आहे. आम्हाला खेळायचे आहे. तेही आता लगेच. आमचा राग, निराशा आणि वेदना आता बदलत चालली आहे. आमच्या प्रिय खेळाला पुन्हा उभारी देण्यासाठी जे काही करावे लागेल, ते करण्यास तयार आहोत." अशा शब्दांत त्यांनी भावना मांडल्या.

# 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप' साठी १२ संघ खेळणार
## कसोटी क्रिकेट दोन भागांत विभागले जाणार नाही

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ मधील सामने सध्या खेळवले जात आहेत. यादरम्यान आयसीसीने एक मोठा निर्णय घेतला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये सध्या जगभरातील ९ संघ खेळत आहेत. आता यात अजून ३ संघांची भर पडणार आहे. यासह वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धा आता १२ कसोटी संघांमध्ये खेळवली जाणार आहे. संघांना आता दोन स्तरांमध्ये विभागले जाणार नाही. शिवाय, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषददेखील एकदिवसीय सुपर लीग पुन्हा सुरू करण्याची तयारी करत आहे.

नुकतीच दुबईमध्ये आयसीसीची सर्वसाधारण सभा झाली. न्यूझीलंडचे माजी फलंदाज रॉजर टॉव्स यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आयसीसीला आपला अहवाल सादर केला, ज्यामध्ये क्रिकेटच्या तिन्ही स्वरूपांच्या विकासावर चर्चा करण्यात आली. अनेक क्रिकेट तज्ज्ञांनी असे सुचवले आहे की, कसोटी क्रिकेट दोन स्तरांमध्ये विभागले जावे, ज्यामध्ये अव्वल संघ एका गटात असतील आणि उर्वरित संघ दुसऱ्या गटात असतील. आयसीसीने या वर्षी जुलैमध्ये एक समिती स्थापन करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. तथापि, आयसीसीच्या बैठकीत द्विस्तरीय प्रणाली नाकारण्यात आली.

२०२७ पासून जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत १२ कसोटी खेळणारे संघ सहभागी होतील असं म्हटलं जात आहे. सध्या फक्त नऊ संघ जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत खेळतात. उर्वरित तीन संघ आता सहभागी होणार आहेत. हे तीन संघ म्हणजे अफगाणिस्तान, झिम्बाब्वे आणि आयर्लंड. हे तिन्ही संघ कसोटी सामने खेळतात पण ते जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग नव्हते. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत त्यांचा प्रवेश आता निश्चित मानला जात आहे, ज्यामुळे स्पर्धेचा उत्साह आणखी वाढेल. तथापि, आयसीसी कसोटी सामन्यांच्या आयोजनासाठी निधी देणार नाही.मोठ्या संघांनी लहान संघांविरुद्ध कसोटी खेळल्यास त्यांना प्रोत्साहनपर कार्यक्रम देखील असेल.




विश्वचषकात संघ वाढणार नाहीत आयसीसीच्या बैठकीत दोन्ही प्रकारच्या व्हाईट-बॉल फॉरमॅटसाठी वर्ल्ड कपमध्ये सहभागी होणाऱ्या संघांची संख्या वाढवण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात फक्त १४ संघ सहभागी होतील. टी-२० विश्वचषक हा २० संघांचा कार्यक्रम राहील. तथापि, भविष्यात, ३२ संघ स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

### वन डे सुपर लीग परत येऊ शकते

आयसीसीच्या बैठकीत एकदिवसीय सुपर लीग परत येण्याचे संकेतही देण्यात आले. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकानंतर ती बंद करण्यात आली. २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकानंतर ती परत येऊ शकते असे मानले जाते. ही १३ संघांची लीग जुलै २०२० मध्ये सुरू झाली, ज्यामध्ये पॉइंट टेबलवरील टॉप १० संघांना पुढील विश्वचषकात प्रवेश मिळेल. व्यस्त क्रिकेट कॅलेंडरमुळे सुपर लीग रद्द करण्यात आली. तथापि, द्विपक्षीय मालिकांमध्ये गुण प्रणाली सुरू केल्याने प्रत्येक मालिकेचे महत्त्व वाढेल. यामुळे एकदिवसीय क्रिकेटच्या मृत्यूचा धोका देखील कमी होईल. सुपर लीग २०२८ मध्ये परत येऊ शकते; परंतु सहभागी होणाऱ्या संघांच्या संख्येबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

# 'आयसीसी वन डे' क्रमवारीत रोहित शर्मा अव्वल क्रमाकांवर कायम
## 'टॉप-१०'मध्ये भारताचे चार फलंदाज



**आयसीसी क्रमवारी**

- रोहित शर्मा (भारत) - ७८१
- इब्राहिम जादरान (अफगानिस्तान) - ७६४
- डेरियल मिशेल (न्यूझीलँड) - ७४६
- शुभमन गिल (भारत) - ७४५
- विराट कोहली (भारत) - ७२५
- चरिथ असलंका (श्रीलंका) - ७१०
- बाबर आजम (पाकिस्तान) - ७०९
- हैरी टेक्टर (आयरलँड) - ७०८
- श्रेयस अय्यर (भारत) - ७००
- शाई होप (वेस्टइंडीज) - ६९०




◆ **दुबई (वृत्तसंस्था) :**

आयसीसी एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत रोहित शर्माने आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. तर विराट कोहलीने पाकिस्तानच्या बाबर आझमला मागे टाकले आहे. विराट कोहली ७२५ गुणांसह पाचव्या स्थानावर पोहोचला. दरम्यान, बाबर आझम (७०९ धावा) दोन स्थानांनी घसरून सातव्या स्थानावर पोहोचला.

रोहित शर्मा (७८१ गुण) पहिल्या स्थानावर आहे, तर कर्णधार शुभमन गिल (७४५ गुण) चौथ्या स्थानावर आहे. टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत तिलक वर्मा देखील दोन स्थानांनी घसरला आहे आणि ७६१ गुणांसह तो पाचव्या स्थानावर आहे. श्रीलंकेचा पथुम निस्सांका (७७९ गुण) तिसऱ्या स्थानावर आहे, तर जोस बटलर (७७० गुण) चौथ्या स्थानावर आहे.

दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंकेविरुद्धच्या प्रभावी कामगिरीचा फायदा घेत पाकिस्तानच्या सलमान आगा आणि फिरकी गोलंदाज अबरार अहमद यांनी कारकिर्दीतील सर्वोत्तम क्रमवारी गाठली आहे. शुभमन गिल आठ स्थानांची प्रगती करत २२ व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### कसोटी क्रमवारीत इंग्लंड दुसऱ्या स्थानावर

कसोटी संघाच्या क्रमवारीत इंग्लंड संघ दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने विश्वविजेत्या दक्षिण आफ्रिकेला मागे टाकले. या यादीत ऑस्ट्रेलिया पहिल्या क्रमांकावर आहे. कांगारू संघाचे १२४ रेटिंग गुण आहेत. दरम्यान, इंग्लंड (११२) आणि दक्षिण आफ्रिका (१११) अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. भारत १०८ गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहे.

## वेचक

### आरसीबीचे घरच्या मैदानावरील सामने पुण्यात?

**बंगळूरु :** आगामी हंगामासाठी आरसीबी घरच्या मैदानातील सामने बंगळूरुऐवजी पुण्यातील एससीएच्या मैदानावर खेळण्याच्या विचारात आहे. याबाबत अधिकृत निर्णय झालेला नाही, मात्र तशी चर्चा सुरू असल्याचं सांगितलं जातं आहे. गेल्या वर्षी बंगळूरुमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीमुळे हा निर्णय घेतला जात असल्याची माहिती आहे. यासंदर्भात बोलताना एमसीएचे सेक्रेटरी कमलेश पिसाळ म्हणाले, "आरसीबीचे घरचे सामने पुण्यात खेळवले जाण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. गेल्या वर्षी बंगळूरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

### कोलकाता कसोटीत रेड्डीऐवजी ध्रुव जुरेलला संधी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोइशेट यांनी बुधवारी सांगितले की, यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात खेळेल. अष्टपैलू नितीश रेड्डी कसोटी मालिकेला मुकण्याची शक्यता आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना शुक्रवार, १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथे खेळला जाईल. "आमच्याकडे संघ संयोजनाबाबत आता बरीच स्पष्टता आहे. गेल्या सहा महिन्यांत ध्रुवने ज्या प्रकारची कामगिरी दाखवली आहे, विशेषतः गेल्या आठवड्यात बंगळुरूमध्ये दक्षिण आफ्रिका अ संघाविरुद्ध दोन शतके झळकावली आहेत, त्यामुळे तो या आठवड्यात नक्कीच खेळेल," असे रायन बुधवारी पत्रकार परिषदेत म्हणाले. ते पुढे म्हणाले, "आमची प्राथमिकता सामना जिंकण्यासाठी रणनीती विकसित करणे आहे. नितीशबद्दलची आमची भूमिका बदललेली नाही. त्याला ऑस्ट्रेलियामध्ये खेळण्याची फारशी संधी मिळाली नाही. परंतु या मालिकेचे महत्त्व आणि परिस्थिती पाहता, तो या आठवड्यात पहिल्या कसोटीत खेळू शकणार नाही अशी शक्यता आहे." भारतीय संघासाठी विकेटकीपर-फलंदाज ध्रुव जुरेल चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्याने दक्षिण आफ्रिका अ संघाविरुद्ध २५९ धावा केल्या, ज्यात दोन शतकांचा समावेश आहे. तो मालिकेतील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. यापूर्वी त्याने ऑक्टोबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या घरच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात शतक झळकावले होते.

### सिल्हेट कसोटीत आयर्लंडच्या २७० धावा

**सिल्हेट :** बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी आयर्लंडने ८ विकेट गमावून २७० धावा केल्या आहेत. मंगळवारी सिल्हेटमध्ये आयर्लंडने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. संघाकडून दोन फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. पॉल स्टर्लिंगने सर्वाधिक ६० धावा केल्या. बांगलादेशकडून मेहदी हसन मिराजने ३ विकेट घेतल्या. पहिल्या दिवसाच्या अखेरीस बांगलादेशच्या फिरकीपटूंनी सामन्यावर नियंत्रण मिळवले. आयर्लंडने दमदार सुरुवात केल्यानंतरही खेळाची गती गमावली आणि दिवसाचा शेवट ८/२७० असा झाला. बांगलादेशचा पदार्पण करणारा डावखुरा फिरकीपटू हसन मुरादने दोन बळी घेतले. पहिल्या सत्रात मजबूत स्थितीत असलेले आयर्लंड दुसऱ्या सत्रात डळमळीत झाले. तिसऱ्या सत्रात बांगलादेशने पहिला बळी मिळविण्यासाठी अर्धा तास घेतला; परंतु नंतर लगेचच चार बळी घेतले. कर्टिस कॅम्फर ४४ धावांवर बाद झाला आणि त्याला हसन मुरादने स्लिपमध्ये झेल दिला. त्यानंतर त्याने ४१ धावांवर स्टंप झालेल्या लॉर्कन टकरला बाद केले. पहिल्या सत्रात बांगलादेशने तीन सोपे झेल सोडले. स्टर्लिंगला दोन झेल सोडण्यात आले.

# जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत ऐश्वर्यची विश्वविक्रमाशी बरोबरी

◆ **कैरो (वृत्तसंस्था) :**

भारताचा रायफल नेमबाज ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर याने ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पात्रता फेरीत जागतिक विक्रमाशी बरोबरी साधली. मात्र, अंतिम फेरीत त्याला अखेरीस रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

भारताचा ऑलिम्पिक पदकविजेता स्वप्नील कुसाळे अपयशी ठरत असतानाच ऐश्वर्यने मात्र पात्रता फेरीतच ५९७ गुणांचा वेध घेताना जागतिक विक्रमाची बरोबरी साधली आणि अंतिम विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रताही सिद्ध केली. भारताचा नीरज कुमारही ५९२ गुणांसह अंतिम फेरीसाठी पात्र ठरला. कुसाळे मात्र पात्रता फेरीतच ४४व्या स्थानावर राहिला. अंतिम फेरीत ऐश्वर्यने ४६६.९ गुणांचा वेध घेताना दुसरे स्थान मिळवले. चीनच्या युकुन लियू याने ४६७.१ गुणांसह सुवर्णपदक पटकावले. फ्रान्सचा औफ्रेरे ४५४.८ गुणांसह कांस्यपदकाचा मानकरी ठरला. अंतिम फेरी गाठणारा भारताचा दुसरा नेमबाज नीरज कुमार ४३२.६ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिला.

वैयक्तिक सुवर्णपदक पटकावणाऱ्या सम्राट राणा याने सलग दुसऱ्या दिवशी १० मीटर पिस्तूल प्रकारात जागतिक पदकाची कमाई केली. सम्राटने ईशा सिंगसह १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात मिश्र सांघिक प्रकारात रौप्यपदक मिळविले. अंतिम फेरीत सम्राट-ईशाला चीनच्या क्विआनशुन याओ आणि कई हू जोडीविरुद्ध १०-१६ असा पराभव पत्करावा लागला.

# पहिल्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानकडून श्रीलंकेचा पराभव

◆ **रावळपिंडी (वृत्तसंस्था):**

रावळपिंडी येथे खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात, पाकिस्तानने श्रीलंकेवर ६ धावांनी विजय मिळवला आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. विजयासाठी ३०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, श्रीलंकेचा संघ केवळ २९३/९ धावाच करू शकला. पाकिस्तानकडून हरिस रौफने शानदार गोलंदाजी केली आणि ४ बळी घेतले. दरम्यान, सलमान आगाने ८३ चेंडूत १०३ धावांची नाबाद खेळी केली आणि हुसेन तलतने ५८ धावांची खेळी करत पाकिस्तानचा धावसंख्या २९९ पर्यंत नेली.

नाणेफेक गमावून फलंदाजीचा निर्णय घेतलेल्या पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. सईम अयुब फक्त ६ धावांवर बाद झाला. वरच्या फळीत फखर जमान (३२) आणि बाबर आझम (२९) देखील बाद झाले.

त्यानंतर, मधल्या फळीत सलमान आगा यांनी शतक (१०३*, ८३ चेंडू) आणि हुसेन तलत यांनी ५८ धावा करून पाकिस्तानला मजबूत स्थितीत आणले. दोघांनी पाचव्या विकेटसाठी १३८ धावांची भागीदारी केली. पाकिस्तानने शेवटच्या दहा षटकांत १०४ धावा जोडून २९९ धावांचा आव्हानात्मक टप्पा गाठला. मोहम्मद नवाजने २३ चेंडूंत १ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ३६ धावांची नाबाद खेळी केली. श्रीलंकेकडून वानिंदू हसरंगा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने १० षटकांत ५४ धावांत ३ बळी घेतले. असिता फर्नांडो आणि महीश तीक्षणा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

श्रीलंकेची सुरुवात चांगली झाली. पथुम निस्सांका आणि पदार्पण करणारा कामिंदू मिश्रा यांनी पाकिस्तानी गोलंदाजांवर दबाव आणण्यासाठी ८० धावा जोडल्या. तथापि, हरिस रौफच्या जलद गोलंदाजीने सामन्याचा मार्ग बदलला. त्याने मिशारा आणि कुसल मेंडिस यांना सलग चेंडूंवर बाद करून श्रीलंकेला मोठा धक्का दिला. त्यानंतर निसांका बाद झाला आणि धावसंख्या ८५/० वरून ९०/३ वर आणली. चारिथ असलंका आणि सदीरा समरविक्रमाने काही काळ स्थिरता राखली, परंतु बाबर आझमने शाहीन आफ्रिदीला स्लिपमध्ये झेल देऊन ही भागीदारी मोडली.

अखेरीस वानिंदू हसरंगाने श्रीलंकेच्या आशा जिवंत ठेवल्या. त्याने ५२ चेंडूत ५९ धावा करून संघाला विजयाच्या जवळ नेले, परंतु शेवटच्या षटकात बाबर आझमने त्याला झेलबाद केले. महीश तीक्षणाने शेवटच्या षटकात दोन चौकार मारून सामना रोमांचक बनवला, परंतु हुसेनने दबावाखाली उत्कृष्ट गोलंदाजी करत पाकिस्तानला विजय मिळवून दिला. पाकिस्तानकडून हरिस रौफने चार विकेट घेतल्या.





मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यपदासाठी बुधवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर मतदान झाले. यावेळी माजी भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, अजित आगरकर, झहीर खान, राष्ट्रवादी (शप) गटाचे प्रमुख शरद पवार, नाना पटोले यावेळी उपस्थित होते.

### सबर्बन मुंबईचा तायक्वांदो संघ जाहीर

**मुंबई :** तायक्वांदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई तर्फे सोमवारी सेंट अँथनी हायस्कूल, साकीनाका येथे जिल्हा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत २०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा आधुनिक सेन्सर पद्धतीने घेण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका लीडा सॅन्टीस, आंतरराष्ट्रीय पुमसे प्रशिक्षक रॉबिन मेंजेस,तसेच तायक्वांदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे पदाधिकारी संदीप येवले (अध्यक्ष), संदीप चव्हाण (सचिव), कल्पेश गोलांबडे आणि संतोष कुंभार, जगदीश अंचन यांच्या हस्ते करण्यात आले.

# दक्षिण आफ्रिकेतील टी-२० लीगलाही भारतात मोठा चाहतावर्ग

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**

दक्षिण आफ्रिकेची प्रमुख टी-२० लीग असलेल्या एस ए २० ला भारतात वाढती लोकप्रियता आणि चाहतावर्ग मिळत असल्याचा अनुभव येत आहे. मुंबईत पार पडलेल्या 'एसए-२० इंडिया डे २०२५' कार्यक्रमातून हे दिसून आले.

म्युझियम ऑफ सोल्युशन्स येथे आयोजित या सोहळ्यात लीग कमिशनर ग्रेम स्मिथ, दक्षिण आफ्रिकन दिग्गज आणि विद्यमान तारे फाफ डू प्लेसिस (जोबर्ग सुपर किंग्स), डेव्हिड मिलर (पार्ल रॉयल्स), टॉम मूडी (डर्बन'स सुपर जायंट्स), हाशिम आमला (एमआय केप टाऊन) आणि दक्षिण आफ्रिकन दिग्गज मार्क बाउचर सहभागी झाले. या सोहळ्यात ट्रिस्टन स्टब्स (सनरायझर्स इस्टर्न केप), ॲड्रियन बिरेल्ल (हेड कोच, सनरायझर्स इस्टर्न केप) आणि सौरव गांगुली (हेड कोच, प्रिटोरिया कॅपिटल्स) यांनी विशेष व्हिडिओद्वारे सहभाग नोंदवला आणि सीझन ४ साठी आपला पाठिंबा व्यक्त केला. लीगचा विस्तार साजरा करण्यासाठी कार्यक्रमात विविध फ्रँचायझी प्रतिनिधी आणि अधिकृत प्रसारक जिओस्टार देखील सहभागी झाले.




पहिल्या तीन सिझनमध्ये, एसए २० ने भारताबाहेरील सर्वात मोठी टी २० लीग म्हणून आपली ओळख प्रस्थापित केली आहे. एसए २० लीग कमिशनर ग्रेम स्मिथ म्हणाले, "भारत सुरुवातीपासूनच एसए२० च्या प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे. आयपीएल मालकीच्या संघांचे पाठबळ आणि जिओस्टारसोबतची भागीदारी ही आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

'एसए२० इंडिया डे २०२५' मध्ये जिओस्टारने सीझन ४ साठीचा त्यांचा प्रोमो सादर केला. त्यात एसए २० च्या गतिमान खेळाची आणि उत्साही चाहत्यांच्या उर्जेची झलक दाखवणारा एक प्रभावी दृश्यात्मक अनुभव होता. त्यातून आगामी रोमांचक सिझनसाठी वातावरण तयार केले. याशिवाय, कंटेंट क्रिएटर्स आणि सुपरफॅन्स यांनी भारतात लीगच्या अस्सल भावनांचा आनंद घेतला आणि प्रत्येकाला एसए २० संबंधित विशेष गोष्टी मिळाल्या.

## रोहित शर्मा सात वर्षांनी विजय हजारे चषक खेळणार

# संघात राहायचे असेल, तर आधी देशांतर्गत सामने खेळा : बीसीसीआय

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

रोहित शर्मा सात वर्षांनी विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळणार आहे. तो शेवटचा २०१८ मध्ये या स्पर्धेत खेळला होता. रोहितने मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) ला या स्पर्धेसाठी त्याच्या उपलब्धतेची माहिती दिली आहे. तथापि, विराट कोहलीने अद्याप दिल्ली क्रिकेट असोसिएशनला (डीडीसीए) स्पर्धेत सहभागी होण्याबाबत माहिती दिलेली नाही. तो २०१० मध्ये विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळला होता. यापूर्वी, बीसीसीआयने रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना सांगितले होते की एकदिवसीय संघात त्यांचे स्थान टिकवून ठेवण्यासाठी त्यांना देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घ्यावा लागेल. विजय हजारे ट्रॉफी २४ डिसेंबरपासून सुरू होत आहे.




रोहित शर्मा विराट कोहलीला जर भारताच्या एकदिवसीय संघात स्थान टिकवायचं असेल, तर त्यांना देशांतर्गत क्रिकेटमधूनच मार्ग काढावा लागणार आहे. असा संदेश भारतीय क्रिकेट मंडळाने दोन्ही दिग्गज खेळाडूंना दिला आहे. २४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये हे दोन्ही खेळाडू खेळताना दिसण्याची शक्यता आहे. हा एकमेव वनडे सामना आहे, जो दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या मालिकेनंतर आणि न्यूझीलंडविरूद्ध मालिकेपूर्वी खेळवला जाणार आहे.

२०२४-२५ च्या रणजी ट्रॉफी हंगामात रोहित आणि कोहली यांनी प्रत्येकी एकच रणजी ट्रॉफी सामना खेळला. जानेवारीमध्ये, कोहली १२ वर्षांनी दिल्लीकडून खेळला, तर रोहित १० वर्षांनी मुंबईकडून खेळला.

रोहित २६ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेसाठी देखील उपलब्ध असू शकतो. तो सध्या मुंबईतील शरद पवार इनडोअर अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. बोर्डाला आशा आहे की, सध्या लंडनमध्ये असलेला कोहली देखील देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसेल.

# 'महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा म्हणजे संघभावनेचा संस्कार'

◆ **अमरावती (प्रतिनिधी):**

महावितरणने खेळाडूंना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. अनेक महिला व पुरुष खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले आहेत. कोणत्याही सांघिक खेळ प्रकारात खेळाडूंमधील परस्पर सहकार्य, समन्वय व विश्वास या त्रिसुत्रीशिवाय विजय शक्य होत नाही. त्यामुळे खेळाडूंमध्ये प्रथम संघभावना निर्माण होणे आवश्यक आहे. महावितरणच्या दरवर्षी होणाऱ्या राज्य क्रीडा स्पर्धा या महावितरणच्या कर्मचाऱ्यांसाठी एकजुटीचा व संघभावनेचा संस्कार आहे असे प्रतिपादन संचालक राजेंद्र पवार यांनी बुधवारी केले.

अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडा संकुलात राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटक म्हणून संचालक पवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंताअशोक साळुंके होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कोकणचे सहव्यस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंते सर्वश्री सुहास रंगारी, दिलीप दोडके, स्वप्नील काटकर, चंद्रमणी मिश्रा, संजय पाटील, राजेश नाईक, अरविंद बुलबुले, संजीव भोळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे तसेच प्राचार्य श्रीनिवास देशपांडे यांची उपस्थिती होती.



अतिशय चुरशीच्या १०० मीटर धावस्पर्धेत पुरुष गटात गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) यांनी सुवर्णपदक तर साईनाथ मसाणे (सांघिक कार्यालय-भांडूप) यांनी रौप्य पदक पटकावले. तर महिला गटात प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) यांनी सुवर्णपदक तर श्वेतांबरी अंबादे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) यांनी रौप्य पदक मिळवले.

## वेचक

### गुजरातमधील औषध कंपनीत झालेल्या स्फोटात ३ कामगारांचा मृत्यू

**गांधीनगर :** गुजरातमधील भरूच जिल्ह्यातील जीआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील औषध कारखान्यात मंगळवारी मध्यरात्री २.३० वाजताच्या सुमारास स्फोट झाला. या स्फोटात तीन कामगारांचा मृत्यू झाला, तर २० जण गंभीर जखमी झाले आहेत. या जखमींना भरूचमधील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापैकी चार ते पाच कर्मचाऱ्यांची प्रकृती गंभीर आहे. हा स्फोट इतका जोरदार होता की, त्यामुळे जवळच्या चार कंपन्यांचेही नुकसान झाले. या स्फोटानंतर बहुतेक कामगार बाहेर पडण्यात यशस्वी झाले; परंतु त्यापैकी तीन जण अडकल्याने त्यांचा मृत्यू झाला. आग विझवल्यानंतर त्यांचे मृतदेह ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले. या दुर्घटनेत सुमारे २० कामगार जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या सहा पथके घटनास्थळी धाव घेतली. या स्फोटानंतर एक व्यक्ती बेपत्ता असून इमारतीत अडकल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, अग्निशमन दल, पोलीस आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांचे पथक घटनास्थळाची कसून तपासणी करत आहेत.

### लोखंडी सळई कोसळून तरुणाचा जागीच मृत्यू

**मुंबई :** नाशिकहून मुंबईत पहिल्यांदा फिरायला आलेल्या ३० वर्षीय तरुणाचा मरोळ मेट्रो स्टेशनखाली सुरू असलेल्या 'प्रिविलोन' या विकासकाच्या बांधकाम साइटवरून सातव्या मजल्यावरून लोखंडी सळई कोसळून मृत्यू झाला. अमर आनंद पगारे असे या तरुणाचे नाव आहे. अमर पगारे हा बुधवारी सकाळी नाशिकवरून मुंबईत फिरण्यासाठी आला होता. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह कूपर रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. मुंबईत गेल्या काही दिवसांत बांधकाम साइटवरून दगड, सळई आणि सिमेंट ब्लॉक्स कोसळून होणाऱ्या मृत्यूंच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. यामुळे कधीकाळी गुन्हेगारीने, कधी अपघाताने, कधी बॉम्बस्फोटाने असुरक्षित वाटणारी मुंबई आता उंच इमारतींच्या बांधकामानेही असुरक्षित वाटू लागली आहे. त्यामुळे, स्थानिक नागरिकांतही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बांधकाम इमारतीच्या सुरक्षाव्यवस्था रामभरोसे आहेत का? असा प्रश्न आता सर्वसामान्य मुंबईकरांकडून विचारला जात आहे.

### मध्य रेल्वेचा निवडक गाड्यांमध्ये एलएचबी डबे लावण्याचा निर्णय

**मुंबई :** मध्य रेल्वेने प्रवाशांच्या अधिक सुरक्षिततेसाठी आणि उत्कृष्ट प्रवास अनुभवासाठी या ८ गाड्यांमधील सध्याच्या (पारंपरिक) डब्यांच्या जागी नवीन एलएचबी डबे कायमस्वरूपी बसवण्याचा निर्णय घेतला आहे.



गाडी क्र. २२१५७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – चेन्नई एक्स्प्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (१४ जानेवारी), गाडी क्र. २२१५८ चेन्नई – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्स्प्रेस, चेन्नई (१७ जानेवारी), गाडी क्र. ११०८८ पुणे – वेरावल एक्स्प्रेस, पुणे (१५ जानेवारी) गाडी क्र. ११०८७ वेरावल – पुणे एक्स्प्रेस, व्हेरावळ येथून (१७ जानेवारी), गाडी क्र. ११०९० पुणे – भगत की कोठी एक्स्प्रेस, पुणे (१८ जानेवारी), गाडी क्र. ११०८९ भगत की कोठी – पुणे एक्स्प्रेस, भगत कोठी (२० जानेवारी), गाडी क्र. ११०९२ पुणे – भुज एक्स्प्रेस, पुणे (१९ जानेवारी), गाडी क्र. ११०९१ भुज – पुणे एक्स्प्रेस, भुज येथून (१५ जानेवारी), गाडी क्र. २२१८६ पुणे – अहमदाबाद एक्स्प्रेस, पुणे २१ जानेवारीपासून नवीन एलएचबी डबे लावण्यात येतील. थांबे आणि वेळापत्रकासंबंधी सविस्तर माहितीसाठी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

# दिल्ली स्फोटाच्या तपासाचे अतिरिक्त महासंचालक विजय साखरे यांच्याकडे नेतृत्व



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाच्या तपासाला आता वेग आला आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) या तपासासाठी १० अधिकाऱ्यांचे जे विशेष पथक तयार केले आहे, त्याचे नेतृत्व अतिरिक्त महासंचालक विजय साखरे या मराठमोळ्या पोलीस अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले आहे. मूळचे नागपूरचे असलेले साखरे हे केरळ केडरचे आयपीएस अधिकारी आहेत. साखरे यांच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथकात एक पोलीस सहसंचालक, तीन पोलीस उपसंचालक आणि तीन पोलीस अधीक्षक यांचा समावेश आहे. या पथकासमोर दिल्लीतील स्फोटाच्या मुळापर्यंत जाण्याचे आव्हान असणार आहे.

विजय साखरे हे १९९६ च्या बॅचचे केरळ केडरचे अधिकारी आहेत. त्यांनी एनआयएमध्ये महानिरीक्षक म्हणूनही काम केले आहे. केरळमध्ये अनेक महत्वाच्या वरिष्ठ पदांवर त्यांनी काम केले आहे. धडाकेबाज पोलीस अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांना एनआयएचे एडीजी म्हणून नियुक्त करण्यात आले.

दिल्ली बॉम्ब स्फोटाच्या तपासातील प्रगतीबाबत एनआयएचे महासंचालक सदानंद दाते आणि गुप्तचर विभागाचे प्रमुख यांच्यात बुधवारी बैठक झाली. सूत्रांच्या माहितीनुसार, एनआयएचे पथक जयप्रकाश नारायण रूग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस करतील. हे पथक जम्मू-काश्मीर, दिल्ली आणि हरियाणा पोलिसांकडून "जैश ए महंमद मॉड्यूल" शी संबंधित सर्व डायऱ्याही ताब्यात घेईल.

दरम्यान, दिल्ली स्फोटाचे धागेदोरे असल्याच्या संशयावरून दिल्लीजवळील फरिदाबादच्या अल-फलाह विद्यापीठाचीही कसून तपासणी सुरू आहे. विद्यापीठाशी संबंधित तीन संशयित दहशतवाद्यांना आधीच अटक करण्यात आली आहे आणि त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. तपास यंत्रणांनी येथून आणखी सहा जणांना ताब्यात घेतले आहे.

तपास यंत्रणांनी अल-फलाह विद्यापीठातील ५० हून अधिक लोकांची आधीच चौकशी केली आहे. या व्यक्तींमध्ये विद्यापीठातील डॉ. मुझम्मिल यांच्यासोबत काही प्राध्यापक, विद्यार्थी आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य यांचा समावेश आहे. या कारवाईदरम्यान सहा जणांना ताब्यात घेण्यात आले.



### पुण्यात दहशतवादी विरोधी पथकाची छापेमारी

पुण्यातील कोंढवा भागात दहशतवादी विरोधी पथकाने छापेमारी केल आहे. यावेळी एका व्यक्तीची कसून तपासणी करण्यात येत आहे. या व्यक्तीला अद्याप ताब्यात घेतलेले नाही, मात्र त्याच्या घराची झडती घेण्यात आली आहे. या कारवाईत लॅपटॉप, हार्डडिस्क आणि काही इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस जप्त करण्यात आले आहेत अशा माहितीही समोर आली आहे. दहशतवादी जुबेर हंगरगेकर याच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून ही छापेमारी करण्यात आली आहे. संशयित व्यक्तीकडून जप्त करण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस फॉरेन्सिक लॅबकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

### डॉ. निसार-उल-हसन कुठे आहे?

दिल्ली स्फोटाच्या चौकशीत फरीदाबादच्या अल-फलाह मेडिकल कॉलेजमधील वरिष्ठ निवासी डॉक्टर डॉ. निसार-उल-हसन याचे नाव समोर आले, जेव्हा एनआयएने विद्यापीठाच्या प्रयोगशाळेची आणि कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी सुरु केली. काश्मिरी वंशाचे हे डॉक्टर पूर्वी श्रीनगरच्या एसएमएचएस रुग्णालयात सहाय्यक प्राध्यापक होते. जिथे त्याला २०23 मध्ये देशविरोधी कारवायांच्या संशयावरून काढून टाकण्यात आले होते. दिल्ली स्फोटानंतर निसार अचानक गायब झाला, ज्यामुळे जैश मॉड्यूलशी त्याचे संबंध असल्याचा संशय निर्माण झाला. तपास संस्था विद्यापीठ कॅम्पसमध्ये असतानाचे त्याचे फोन रेकॉर्ड, ईमेल आणि सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत, ज्यामुळे उमर आणि मुझम्मिलसारख्या अटक केलेल्या संशयितांशी त्याचे संबंध असल्याचे सिद्ध होत आहे. बेपत्ता निसारचा सध्या देशभर शोध सुरु आहे.

# दिल्ली स्फोटामागील ६ डॉक्टर, २ मौलवी अन् १८ अटकेत

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

दिल्लीत १० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी झालेल्या स्फोटाची पोलीस आणि तपास यंत्रणा दिवसरात्र एक करून या घटनेचा तपास करत आहेत. या स्फोटामध्ये ६ डॉक्टर, २ मौलवी अन् १८ आरोपी आणि संशयित यांना पोलिसांनी पकडले आहे. त्यात अजूनही बरेच फरार आहेत.

या स्फोटामागे जैशचा प्रमुख मौलाना मसूद अजहरचे थेट कनेक्शन पुढे येत आहे. या मॉड्यूलचे प्लॅनिंग २६ नोव्हेंबरच्या सीरियल ब्लास्टसारखे होते; परंतु पोलिसांच्या धाडीमुळे घाबरलेल्या मुख्य संशयिताने घाईगडबडीत हा हल्ला केला. यासाठी फंडिंग पाकिस्तानच्या टेलिग्रॅम चॅनेल आणि क्रिप्टोकरेंसीच्या माध्यमातून झाले होते. या षडयंत्रात डॉ. उमर मोहम्मद होता, जो पुलवामाच्या कोइल गावातील ३६ वर्षीय एमबीबीएस डॉक्टर होता. तो फरीदाबादच्या अल फलाह मेडिकल कॉलेजमध्ये काम करत होता. दुसरा महत्त्वाचा आरोपी डॉ. आदिल अहमद हा असून तो सहारनपूर येथे खासगी दवाखान्यात काम करायचा. त्याला जैशचे पोस्टर लावल्याप्रकरणी ५ नोव्हेंबरला अटक केली होती. त्याच्या लॉकरमधून एके ४७ जप्त करण्यात आली होती. त्याच्या चौकशीत उमर आणि मुझम्मिलची माहिती समोर आली.



पुलवामा येथील ३५ वर्षीय डॉक्टर मुझम्मिल शकील व्हाइट कॉलर टेररचा चेहरा होता. तो अल फलाह यूनिवर्सिटीत असिस्टेंट प्रोफेसर म्हणून काम करत होता. त्याच्या भाड्याने घेतलेल्या घरात २९०० किलो स्फोटके सापडली. ३० ऑक्टोबरला जैशचे पोस्टर लावल्यानंतर तो फरार होता. ९ नोव्हेंबरला फरीदाबाद येथून अटक करण्यात आली. त्यानंतर लखनौच्या लालबाग येथे राहणारी डॉ. शाहीन शहीद जैशच्या महिला विंगची भारतातील प्रमुख होती, तीदेखील अल फलाह यूनिवर्सिटीत काम करत होती. तिलाही ९ नोव्हेंबरला अटक झाली. लखनौचा डॉ. परवेज अंसारी हा इंटीग्रल यूनिवर्सिटीत प्रोफेसर होता; परंतु त्याची मोठी बहीण डॉ. शाहीनच्या अटकेनंतर त्याच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले. ७ नोव्हेंबर २०२५ ला त्याने अचानक ईमेल पाठवून नोकरी सोडली होती. ज्यामुळे तो फरार असल्याचा संशय आला. यूपी एटीएसने तातडीने कारवाई करत त्यालाही ताब्यात घेतले. स्फोटानंतर शाहीन आणि परवेज यांच्यात झालेला संवादही समोर आला आहे. पुलवामा येथील डॉ. सज्जाद अहमद मल्ला श्रीनगरच्या प्रतिष्ठित हॉस्पिटलमध्ये डॉक्टर म्हणून आहे. त्याची मैत्री मुख्य संशयित डॉक्टर उमर मोहम्मदशी होती. ११ नोव्हेंबरला त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले. कुलगाम जिल्ह्यातील डॉ. तजामुल अहमद मलिक यालाही ताब्यात घेण्यात आला आहे. तजामुलचे नाव उमर आणि मुझम्मिल नेटवर्कमधून फोन रेकॉर्ड्स ऐकून समोर आले. १२ तासांच्या चौकशीनंतर पोलिसांनी त्याला सोडून दिले आहे.

### लेडी डॉक्टर शाहीनबाबत मोठे खुलासे!

- जैश-ए-मोहम्मदच्या फरिदाबाद मॉड्यूलच्या दहशतवादी निधीची आता एजन्सी चौकशी करत आहेत. सूत्रांचे म्हणणे आहे की, लेडी डॉक्टर शाहीनला जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेकडून निधी मिळत होता. जैश-ए-मोहम्मदच्या इशाऱ्यावर, शाहीन पश्चिम उत्तर प्रदेशातील विविध ठिकाणी महिला शाखेसाठी भरती केंद्रे उघडण्यात सहभागी झाली होती.
- शाहीनला जैश-ए-मोहम्मदकडून मिनी रिक्रूट-कमांड सेंटरसाठी निधी मिळाला. शहराच्या बाहेरील भागात आणि कमी मानवी हालचाली असलेल्या या मिनी रिक्रूट-कमांड सेंटरसाठी शाहीन सहारनपूर आणि हापूरमध्ये ठिकाणे शोधत होती. तपास यंत्रणांना संशय आहे की, शाहीननेच जैश-ए-मोहम्मदच्या या मॉड्यूलला दहशतवादी निधी पुरवला होता.
- शाहीन, आदिल, उमर आणि मुझम्मिल यांच्या खात्यांची तपासणी केली जात आहे. शाहीनच्या खात्यात परदेशी निधीचेही संकेत सापडले आहेत आणि त्याबाबत शाहीनची सतत चौकशी केली जात आहे. शिवाय, मौलवी इरफान अहमद हा जैशच्या एका कमांडरच्या संपर्कात होता आणि त्याला जैशकडून निधी मिळत होता. शाहीन मदरसे आणि इरफान जकातच्या नावाखाली गरीब मुस्लीम मुली आणि महिलांसाठी निधी गोळा करत होती. तपास यंत्रणांना संशय आहे की, याचा वापर स्फोटके आणि गुप्तहेरांसाठी केला जात होता. शाहीन अझहर मसूदची बहीण सहिदा अझहर हिच्याशी थेट संपर्कात होती.

# एटीएसची इब्राहिम अबिदी याच्या मुंब्रा अन् कुर्ला येथील घरावर धाड

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

पुण्यातील अल कायदा प्रकरणाचे धागेदोरे आता मुंब्र्यापर्यंत पोहोचले आहेत. पुणे एटीएसने सॉफ्टवेअर इंजिनीअर जुबेर इलियास याला अटक केल्यानंतर, महाराष्ट्र एटीएसने मुंब्रा आणि कुर्ला येथे अनेक ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईत इब्राहिम अबिदी नावाच्या शिक्षकाला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येत आहे. एटीएसला संशय आहे की, 'हा मुलांना दहशतवादी कृत्यांसाठी प्रवृत्त करत होता'. अबिदीच्या घरातून इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त करण्यात आल्या असून, त्याचा तपास केला जाणार आहे. ही कारवाई 'अल कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट' या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ जिहादचा प्रसार करण्याच्या आरोपाखाली अटक केलेल्या जुबेर इलियास प्रकरणाचा भाग असल्याचे सांगितले जात आहे.




पुणे एटीएसने मुंब्रा कोसा येथे इब्राहिम आबिदी यांच्या घरी छापेमारी केली. मुंब्रा येथील घरी छापेमारी केल्यानंतर आबिदीच्या कुर्ला येथील घरावरही एटीएसने शोधमोहीम केली. मात्र लॉकडाऊननंतर अबिदी याने दुसरे लग्न केले, ते मुंब्रा येथे राहायला गेल्यानंतर या कुटुंबीयांशी फारसा संबध ठेवला नसल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. मुंब्र्यात दहशतवाद विरोधी पथकाचे धाडसत्र सुरू असल्याची माहिती पुढे आली आहे. यात शिक्षक असलेल्या इब्राहिम अबिदी यांच्या मुंब्रा आणि कुर्ला येथील घरावर एटीएसने धाड टाकली. यावेळी घरातून मोबाइल, लॅपटॉप, हार्ड डिस्क जप्त करण्यात आलीय, तर पुण्यातील जुबैर हंगरगेकर यांच्या प्रकरणाशी संबंध असल्याच्या संशयावरून एटीएसने ही कारवाई केली आहे.

अल-कायदा इन इंडियन सबकॉंटिनेंट संघटेंनेचा समर्थक असल्याचा आणि जिहादचा कथित प्रचार केल्याप्रकरणी हंगरगेकरला अटक झाली होती. मात्र इब्राहिम आबिदींच्या कुटुंबीयांकडून या आरोपांचा खंडन करत सांगितले की, इब्राहिम अबिदी मदरश्यात उर्दू शिकवत नसून साबू सिद्दीकी महाविद्यालय ३५ वर्षांपासून प्राध्यापक असल्याची कुटुंबीयांनी माहिती दिली.

### एसटी आगारप्रमुखांना सकाळी बसस्थानकात हजर राहणे बंधनकारक

**मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लांब व मध्यम लांब पल्ल्यांच्या फेऱ्यांबाबत महामंडळाने आढावा घेतला असता एसटी आगारातून सुटणाऱ्या काही फेऱ्या वेळेत सुटत नसल्याचे व त्याचा परिणाम आगाराच्या उत्पन्न व भारमानावर होत आहे. म्हणून आता प्रत्येक आगार व्यवस्थापकांना प्रत्येक सोमवारी आगारातून सुटणाऱ्या पहिल्या फेरीच्या वेळेपासून आगारात उपस्थित राहून सर्व फेऱ्या वेळेत सुटेल याची खातरजमा करण्याचे आदेश महामंडळाने बुधवारी दिले.

त्याचप्रमाणे बस किती वाजता फलाटाला लागली, बस स्वच्छता, चालक व वाहक वेळेवर उपस्थित राहतात का याबाबत तपासणी करून कार्यवाही करण्यास सूचनाही त्यांना देण्यात आल्या आहेत. आगार व्यवस्थापकांनी कोणती सबब न सांगता तसेच कोणताही प्रतिनिधी न पाठवता स्वतः दर सोमवारी पहिल्या



फेरीपासून आगारात उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबत केलेल्या कारवाईचा तपशील आगार व्यवस्थापक व विभाग नियंत्रण यांच्या नोंदवहीमध्ये जतन करून ठेवण्यात येणार आहे. याबाबत वाहतूक महाव्यवस्थापक यांच्याकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येणार असून त्यावेळी सदर माहिती सादर करणे बंधनकारक केले आहे. तसेच वरीलप्रमाणे अंमलबजावणी न झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले आहे.



दादर येथील शिवाजी पार्क परिसरावर बुधवारी सकाळी बराच वेळ धुक्याचा प्रभाव पडला होता. सकाळच्या वेळची गुलाबी थंडी व त्यात पडलेले धुके यामुळे क्रिकेटपटू शिवाजी पार्कवर खेळाचा आनंद घेत होते. धुके व थंडी पाहता बदलत्या हवामानाची नांदी असून पाऊस पूर्णपणे गेल्याचे त्यातून स्पष्ट झाले आहे. (छाया : अरुण पाटील)

# तिसरा दिवसही निरंक; एकही नामांकन नाही

## नगर परिषद, नगरपंचायत निवडणूक

**वाडा/ पालघर (प्रतिनिधी):**

जिल्ह्यातील तीन नगर परिषद आणि एका नगरपंचायतीसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज (नामनिर्देशन पत्र) दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी सुद्धा एकही अर्ज दाखल झालेला नाही. राजकीय पक्षाच्या उमेदवारांकडून अखेरच्या दोन-तीन दिवसांत उमेदवारी अर्ज दाखल होतील ही शक्यता पूर्वीपासूनच होती. मात्र पहिल्या तीन दिवसांत एकाही अपक्ष उमेदवाराकडून नामांकन दाखल नसणे ही बाब चर्चेचा विषय ठरत आहे.

पालघर, डहाणू आणि जव्हार या तीन नगर परिषद आणि वाडा नगरपंचायतीसाठी १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालावधीत नामांकन अर्ज स्वीकारण्यात येत आहे. पहिल्या तीन दिवसात या चारही ठिकाणी एकही नामनिर्देशन पत्र दाखल झाले नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे. दरम्यान, या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी थेट मतदान होणार आहे. पालघर नगर परिषदेचे ३०, डहाणू नगर परिषद २७, जव्हार नगरपरिषद २०आणि वाडा नगरपंचायतीची सदस्य संख्या १७ असून, या जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल होणार आहेत.

### रविवारी नामांकन स्वीकारणार नाही

इच्छुक उमेदवारांना नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी १० ते १७ नोव्हेंबर दरम्यान कालावधी देण्यात आला आहे. मात्र १६ नोव्हेंबर रोजी रविवार असल्याने या दिवशी नामांकन अर्ज स्वीकारण्यात येणार नाही असे निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे १४, १५ आणि १७ या तीन दिवसांत अपक्षांसह विविध राजकीय पक्षातील उमेदवारांची अर्ज दाखल करण्यासाठी एकच झुंबड उडणार आहे .

# ११ रेल्वे कर्मचारी 'महिन्याचे सेफ्टी स्टार'



**गोरखपूर (वार्ताहर) :**

ईशान्य रेल्वेचे महाव्यवस्थापक उदय बोरवणकर यांनी सुरक्षेच्या क्षेत्रात त्यांच्या प्रशंसनीय कार्याबद्दल ११ कर्मचाऱ्यांना 'महिन्याचे सेफ्टी स्टार' घोषित करून त्यांना सन्मानित केले.

जून पुरस्कार विजेत्यांपैकी, नानपारा स्टेशनवर कटनवाला म्हणून काम करणारे कर्मचारी मोहीत कुमार शुक्ला यांनी तत्काळ स्टेशन अधीक्षक/रायबोजा यांना कळवले की २९ जून २०२५ रोजी रायबोजा स्टेशनजवळ काम करताना ट्रॅकखालील माती पावसाच्या पाण्याने वाहून गेली होती, त्यामुळे संभाव्य अपघात टळला. पिपराइच स्टेशनवरील ईएसएम-II मोहन लाल यांना १९ जून रोजी काम करताना रेल्वे रुळाला तडे गेल्याचे लक्षात आले आणि त्यांनी संबंधितांना वेळेवर माहिती दिली, त्यामुळे एक गंभीर अपघात टळला. २९ जून रोजी, अमलोरी सारसर स्टेशनवर गेटमन म्हणून काम करत असताना, ओम प्रकाश कुमार यांना ट्रॅकमध्ये वेल्ड क्रॅक दिसला. त्यांनी ताबडतोब ट्रॅक सुरक्षित केला आणि उच्च अधिकाऱ्यांना कळवले. १३ जून रोजी, कासगंज स्टेशनवर काम करत असताना, तंत्रज्ञ जितेंद्र कुमार यांना ट्रेन क्रमांक १५१०९ च्या रोलिंग चाचणी दरम्यान एका डब्यातील तुटलेला प्राथमिक स्प्रिंग दिसला. त्यांनी ताबडतोब पर्यवेक्षकाला कळवले, त्यामुळे संभाव्य अपघात टळला.

पुरणपूर स्टेशनवरील तंत्रज्ञ लाल बहादूर यांनी ३१ ऑगस्ट रोजी दोन पडलेल्या झाडांमुळे झालेला ब्रेकडाउन लवकर दुरुस्त केला. या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे अपघात टाळता आले, यासाठी त्यांना ईशान्य रेल्वेचे महाव्यवस्थापक उदय बोरवणकर यांनी कर्मचाऱ्यांना 'महिन्याचे सेफ्टी स्टार' घोषित केले.

## १० वर्षांच्या पाठपुराव्याला यश

# कुर्लोद उपकेंद्राचा मार्ग मोकळा, जागेचा प्रश्न मिटला!

**मोखाडा (वार्ताहर) :**

मोखाडा तालुक्यातील अतिदुर्गम आणि आरोग्याच्या दृष्टीने अतिशय अडचणीचा ठरत असलेल्या कुर्लोद या ठिकाणी उपकेंद्र व्हावे यासाठी ची मागणी होत होती याला मंजुरी देखील शासनाकडून मिळाली होती मात्र उपकेंद्र कुठे बांधावे यासाठीची जागा उपलब्ध होत नसल्याने गेल्या दहा वर्षापासून हा जागेचा तिढा कायम होता. मात्र तो आता सुटला असून मोखाडा पंचायत समिती आरोग्य विभागाच्या नावावर सदरची जागा झाल्याने आता मंजूर असलेले हे उपकेंद्र लवकरच उभारले जाणार आहे. यामुळे या भागातील आरोग्य समस्या मोठ्या प्रमाणावर सुटेल अशी चिन्हे आहेत. या भागात आरोग्य सुविधा मिळवण्यासाठी शेजारच्या जव्हार तालुक्यात किंवा खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्राचा आधार घ्यावा लागत होता. याशिवाय पावसाळ्यात तर या भागातील संपर्क देखील तुटत असल्याने अनेकदा वाहत्या नदीतून उडक्यावरचा प्रवास किंवा डोली करून रुग्ण नेण्याची वेळ या भागातील नागरिकांवर येत होती. त्या दृष्टीने या भागातच एक आरोग्य उपकेंद्र व्हावे अशी अपेक्षा होती आणि त्यासाठीचा पाठपुरावा देखील लोकप्रतिनिधी आणि शासनाकडून गेल्या दहा वर्षांपासून सुरू होता त्याला आता यश आल्याने या सगळ्यांचे ग्रामस्थांकडून खरे तर आभार व्यक्त होत आहे.



कुर्लोद या ठिकाणी अनेकदा साथीचे रोग आणि विविध आजारांसाठी आरोग्य यंत्रणा उपलब्ध होत नव्हती या ठिकाणी काही दिवस फिरत्या पथकाची सुद्धा निर्मिती केली होती. मात्र हा प्रयोग फार जास्त काळ टिकला नाही. यामुळे या भागात एक उपकेंद्र व्हावं अशी मागणी सुरुवातीला करण्यात आली आणि यासाठी हे उपकेंद्र शासनाकडून मंजूर सुद्धा करण्यात आले होते मात्र ही इमारत बांधण्यासाठी जागा मात्र या ठिकाणी उपलब्ध होत नव्हती. मात्र आता या गेल्या दहा ते बारा वर्षांपासूनच्या या पाठपुराव्याला यश आले असून कुर्लोद गावातील मोडक परिवाराने विनामूल्य आपली जमीन दिल्याने हा मार्ग सुकर झाला आहे. शासन स्तरावर या जमिनीसाठी मोठ्या प्रमाणावर पाठपुरावा मोखाडा तालुका आरोग्य विभाग आणि तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी केला होता. त्यानुसार आता या जागेच्या सातबारावर मोखाडा तालुका आरोग्य विभागाचे नाव आले आहे.

मोखाडा या भागातील कुपोषण बालमृत्यू माता मृत्यू आणि सर्पदशाने देखील मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडकेल्या आहेत. याशिवाय गॅस्ट्रोसारख्या साथीने सुद्धा उच्छंद मांडल्याचे अलीकडे दिसून आले आहे. यामुळे या भौगोलिकदृष्ट्या अतिशय दुर्गम डोंगराळ भागात विभागल्या गेलेल्या वाड्यावर त्यामुळे नागरिकांच्या घरापर्यंत आरोग्य सुविधा पुरविण्याचे मोखाडा आरोग्य विभागाला पार पाडावे लागते. यातूनच दुर्गम भागात उपकेंद्र असावे त्या ठिकाणी २४ तास आरोग्य सेवा उपलब्ध असावी हा शासनाचा देखील हेतू आहे.

**प्रकाश निकम यांचे प्रयत्न :** कुर्लोद या भागात उपकेंद्र होण्यासाठी तत्कालीन पंचायत समितीचे सभापती तसेच जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम यांनी सुद्धा मोठे प्रयत्न केले या ठिकाणी पंचायत समितीची मासिक सभा देखील त्यांनी तेव्हा घेतली होती याशिवाय मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप वाघ यांनी प्रत्यक्ष पाठपुरावा आणि या उपकेंद्रासाठी मोठे उपोषण देखील तालुकास्तरावर केले होते. याशिवाय माजी आमदार सुनील भुसारा यांनी देखील त्यांच्या कार्यकाळात यासाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला याशिवाय भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष चोथे यांनी या उपकेंद्रासाठी तत्कालीन पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्याशिवाय मंत्रालय स्तरावर देखील त्यांच्या माध्यमातून मोठे प्रयत्न झाले होते. एकूणच या सर्व लोकप्रतिनिधी आणि पंचायत समिती आरोग्य विभाग या सर्वांच्या प्रयत्नांना यश आलेले आहे.

**मराठी रंगभूमी**

- **कुणीतरी आहे तिथं**
  दु. ४ वाजता, प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली.
- **चिरंजीव परफेक्ट बिघडलाय!**
  दु. ४.३० वाजता, गडकरी रंगायतन, ठाणे.

## वेचक

### 'सारस्वत चैतन्य गौरव' सोहळा शनिवारी

**मुंबई (प्रतिनिधी) :** सारस्वत प्रकाशन, मुंबई या संस्थेतर्फे गेली ४० वर्षे सारस्वत चैतन्य त्रैमासिक अखंडितपणे प्रकाशित केले जाते. तसेच गौड सारस्वत ब्राह्मण समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने दरवर्षी सारस्वत चैतन्य गौरव सोहळा आयोजित केला जातो. यावर्षीचा गौरव सोहळा शनिवार दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता प्रा. बी. एन. वैद्य सभागृह, राजा शिवाजी विद्यालय संकुल, हिंदू कॉलनी, दादर येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्याला उद्योगपती डॉ. सतीश वाघ, अध्यक्ष : सुप्रिया लाईफ सायन्सेस लि. हे प्रमुख पाहुणे म्हणून व वास्तुविशारद शशी प्रभू, अध्यक्ष, शशी प्रभू अँड असोसिएटस, हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी वामन (उदय) पंडित, डॉ. रेणू गावस्कर, सी. ए. मंगेश किनरे, दिनेश लाड, महेश सरनाईक या नामवंतांना सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी मुंबई व मुंबई बाहेरील अनेक सारस्वत संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या समारंभात आमचा उत्साह वाढवावा व समारंभाची शोभा वृद्धिंगत करावी, असे आवाहन सारस्वत प्रकाशनचे अध्यक्ष दिलीप भिसे व सुधाकर लोटलीकर यांनी केले आहे.

### कुर्ल्यातील हॉटेलमध्ये भीषण आग

**मुंबई :** कुर्ला (पश्चिम) परिसरातील एल.बी.एस. रोडवरील शीतल टॉकीज जवळच्या हॉटेल सन लाईटमधील तळमजल्यावर भीषण आग लागली. बुधवारी, दुपारी ३.५७ वाजता लागलेल्या या आगीत कोणीही जखमी झाले नाही. मात्र आगीच्या लोळातून निघालेल्या प्रचंड धुरामुळे रस्त्यावरील वाहतूक बाधित होऊन नागरिकांना काही काळ त्रास झाला. आगीचे प्राथमिक कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र विनोबा भावे नगर पोलीस याबाबत चौकशी करत आहेत. ही आग लागल्यावर ती विझवण्याचे प्रयत्न तातडीने सुरू करण्यात आले. आगीमुळे धुराचे लोट मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे परिसरामध्ये नागरिकांची धावपळ होताना दिसत होती. या आगीच्या भक्ष्यस्थानी हॉटेल आल्यामुळे हॉटेलचे नुकसान झाले आहे. मात्र त्यात कोणीही जखमी झाले नाही. मात्र मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली असे सांगण्यात येत आहे. ही आग लेव्हल १ ची होती. कुर्ल्यातील सनलाईट हॉटेल, सिटी हॉस्पिटलजवळ, शीतल तलाव जवळ, एलबीएस रोड येथे ही आगीची दुर्घटना घडली. तळमजल्यावर आग लागल्यानंतर पालिकेचे पथक तसेच पोलीस यांच्यासह अग्निशमन दलाचे जवान आणि १०८ रुग्णवाहिका, संबंधित वीज वितरण कंपनीचे कर्मचारी, एडीएफओ १, सीनियर एसओ १, एसओ-१, एफई ४, क्यूआरव्ही १, १ बीए व्हॅन, १ एचपी, ३ जेटी, १ एडब्ल्यूटीटी असा फौजफाटा त्या ठिकाणी तातडीने रवाना झाल्याची माहिती देण्यात आली.



# अतिक्रमण हटवण्यासाठी 'ट्रॅकिंग सिस्टीम'चा आधार

## 'डॅशबोर्ड'च्या माध्यमातून तक्रारी करणे शक्य; मनपाच्या नव्या प्रणालीसाठी साडेचार कोटींचा खर्च

**मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबईतील अतिक्रमण हटवण्यासाठी आता महापालिकेच्यावतीने ट्रॅकिंग सिस्टीम राबवण्यात येणार आहे. यापूर्वी बनवलेल्या प्रणालीमध्ये आता मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला असून यासाठी डॅशबोर्ड तयार करण्यात



आला आहे. यासाठी आर्सियस इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांची निवड करण्यात आली आहे. यासाठी सुमारे साडेचार कोटी रुपये खर्च केले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना आता या डॅशबोर्डच्या माध्यमातून अतिक्रमणांच्या तक्रारी करता येणार असून या सर्व प्रकारच्या तक्रारींचे निवारण या डॅशबोर्ड माध्यमातून होणार असल्याने प्रत्येक अधिकारी या तक्रारींसाठी बांधिल राहणार आहे.

मुंबई महापालिकेने ई-शासन उपक्रमांतर्गत फेब्रुवारी २०१६ मध्ये अतिक्रमण हटवण्यासाठी ट्रॅकिंग आणि व्यवस्थापन प्रणालीला सुरुवात केली. पण या प्रणालीमार्फत नागरिकांना अनधिकृत बांधकामांसंदर्भात तक्रार करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. तसेच माहपालिकेचे अभियंते आणि कर्मचारी यांच्यामार्फत या तक्रारींचे निवारण करण्यासाठीची सोय उपलब्ध केली गेली. परंतु ही प्रणाली कालबाह्य झाल्याने याचा वापर करणाऱ्या नागरिकांना विविध समस्या येत आहे. या प्रणालीमध्ये उद्‌भवणाऱ्या विविध त्रुटींमुळे नवीन प्रणाली विकसित करण्याचा निर्णय अतिक्रमण विभागाने घेतला.

सध्याच्या प्रणालीमध्ये जीआयएस व्हिज्युअलायझेशन, ॲनालिटिक्स, डॅशबोर्ड यांची कमतरता आहे. ही प्रणाली कालबाह्य झाल्याने या प्रणालीमध्ये आधुनिक सुधारणा करण्याचा निर्णय अतिक्रमण निर्मुलन विभागाने घेतला आहे.

### कारवाई करण्यासाठी गो-लाईव्हचा वापर

नागरिकांना अतिक्रमणांच्या तक्रारी करण्यासाठी डॅशबोर्डची सुविधा असावी याकरिता अतिक्रमण विभाग आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाच्यावतीने या प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी सल्लागाराच्या मदतीने संस्थेची निवड केली आहे. या निवड केलेल्या संस्थेच्या माध्यमातून अतिक्रमण हटवण्यासाठी ट्रॅकिंग आणि व्यवस्थापन प्रणाली वेब आणि मोबाईल ॲप्लिकेशनचे डिझाईन, विकास, चाचणी आणि गो-लाईव्हचा वापर केला जाणार आहे. आरईटीएमएस प्रणालीचे इतर प्रणालींसोबत इंटिग्रेशन करणे, ३ वर्षांच्या करार कालावधीसाठी वापरकर्त्यांचे प्रशिक्षण, तसेच क्लाऊड होस्टिंग समर्थन, तांत्रिक मनुष्यबळ पुरवणे आदी कामे केली जाणार आहे.

# उद्या आणि परवा शहरात पाणीबाणी!

## काटकसरीने पाणी वापरण्याचे पालिकेचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई महानगरपालिकेची १२०० मिलिमीटर व्यासाची जुनी तानसा, १२०० मिलिमीटर व्यासाची नवीन तानसा आणि ८०० मिलिमीटर व्यासाच्या विहार ट्रंक मुख्य जलवाहिनीवरील ३०० मिलिमीटर, ६०० मिलिमीटर व ९०० मिलिमीटर व्यासाच्या एकूण पाच झडपा बदण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. हे काम शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून शनिवारी १५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत



(एकूण २२ तास) सुरू राहणार आहे. त्यामुळे या २२ तासांच्या कालावधीत महानगरपालिकेच्या एन, एल, एम पश्चिम आणि एफ उत्तर विभागातील काही भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे.

मुंबई महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणारी जुनी आणि नवीन तानसा जलवाहिनी तसेच विहार ट्रंक मुख्य जलवाहिनीवरील एकूण पाच झडपा (चार बटरफ्लाय झडप आणि १ स्लुईस झडप) बदण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम शुक्रवार १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे पूर्व उपनगरांतील घाटकोपर (एन), कुर्ला (एल), चेंबूर (एम पश्चिम) आणि वडाळा, शीव आणि माटुंगा (एफ उत्तर) या चार प्रशासकीय विभागात काही परिसरांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. तरी संबंधित परिसरातील नागरिकांनी उपरोक्त कालावधीसाठी पाण्याचा आवश्यक साठा करावा. पाणी कपातीच्या कालावधीत काटकसरीने पाणी वापरुन सहकार्य करावे, अशी विनंती बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

### प्रभावित विभागांचा तपशील पुढीलप्रमाणे

**घाटकोपर एन विभाग**

**(दि. १५ नोव्हेंबर, पहाटे ३.४५ मिनिटांपासून सकाळी ८ वाजेपर्यंत)** राजावाडी पूर्वेकडील संपूर्ण परिसर, चित्तरंजन नगरसह विद्याविहार परिसर, राजावाडी रुग्णालय, ओ. एन. जी. सी. वसाहत, रेल्वे कर्मचारी वसाहत, आर. एन. गांधी मार्ग.

**कुर्ला एल विभाग**

(दि. १४ नोव्हेंबर, सकाळी १० वाजेपासून दि. १५ नोव्हेंबर, सकाळी ८ वाजेपर्यंत)
न्यू टिळक नगर, लोकमान्य टिळक टर्मिनस, साबळे नगर, संतोषी माता नगर, क्रांती नगर, नेहरू नगर, मदर डेअरी रस्ता, शिवसृष्टी रस्ता, नाईक नगर, जागृती नगर, केदारनाथ मंदिर मार्ग, एस. जी. बर्वे मार्ग कुर्ला पूर्व, नवरे बाग, कामगार नगर, हनुमान नगर, पोलिस वसाहत, कसाई वाडा, चुनाभट्टी, राहुल नगर, एवरार्ड नगर, कुरेशी नगर, तक्षशिला नगर, चाफे गल्ली, पान बाजार, त्रिमूर्ती मार्ग, व्ही. एन. पुरव मार्ग, उमरवाडी मार्ग, अली दादा इस्टेट, राजीव गांधी नगर, स्वदेशी जेवण चाळ, चुनाभट्टी फाटक, म्हाडाकोळ प्रेम नगर, हिल रोड, मुक्तादेवी मार्ग, ताडवाडी, समर्थ नगर.

**चेंबूर एम पश्चिम विभाग**

**(दि. १४ नोव्हेंबर, सकाळी १० वाजेपासून दि. १५ नोव्हेंबर, सकाळी ८ वाजेपर्यंत)** : टिळक नगर, टिळक नगर स्थानक रस्ता, पेस्टम सागर रस्ता क्रमांक १ ते ६, ठक्कर बाप्पा वसाहत पाडा क्रमांक १ ते ४, शास्त्री नगर, वत्सलाताई नाईक नगर, सहकार नगर, शेल कॉलनी, इंदिरा नगर, एस. जी. बर्वे मार्ग, पूर्व द्रुतगती मार्ग, पश्चिम बाजूकडील सेवा मार्ग (प्रगती सोसायटी), गोदरेज वसाहत, यशवंत नगर, सम्राट अशोक नगर, राजा मिलिंद नगर, आदर्श नगर, भक्ती पार्क, अजमेरा वसाहत, एम. एम. आर. डी. ए. एस. आर. ए. वसाहत.

**शीव, माटुंगा, वडाळा, दादर पूर्व एफ उत्तर विभाग**

**(दि. १५ नोव्हेंबर, पहाटे ३.४५ मिनिटांपासून सकाळी ८ वाजेपर्यंत)** शीव (सायन) पश्चिम आणि पूर्व, दादर पूर्व, माटुंगा पूर्व, वडाळा, चुनाभट्टीचा काही भाग, प्रतीक्षा नगर, शास्त्री नगर, अल्मेडा कंपाउंड, पंचशील नगर, वडाळा ट्रक टर्मिनल, सोडा विल्डिंग्ज (नवीन कफ परेड), शीव कोळीवाडा-सरदार नगर, संजय नगरचा काही भाग, गांधी नगर, के. डी. गायकवाड नगर, कोरबा मिठागर, वडाळा, भीमवाडी येथील प्रवेशद्वार क्रमांक ४ आणि ५.

# बेस्ट कामगारांच्या दीर्घकालीन प्रश्नांसाठी लढा

## शशांक राव यांना भाजप कामगार संघाचा पाठिंबा

**कांदिवली (वार्ताहर) :**

बेस्ट वर्कर युनियनचे सरचिटणीस शशांक शरद राव हे बेस्ट कामगारांच्या मागण्या व दीर्घकालीन प्रश्न सोडवण्यासाठी, मंजूर करण्यासाठी व सेवानिवृत्त कामगारांचे आर्थिक देणे याकरिता उपोषणाला बसले आहेत. आज गरज आहे लढाव्य नेतृत्वाची म्हणून पक्ष भेद, संघटना वाद बाजूला ठेवून भाजप बेस्ट कामगार संघाने जाहीर पाठिंबा देत आहोत, असे संघटनेचे अध्यक्ष गणेश हाके कार्यकारी अध्यक्ष व बेस्ट समिती सदस्य सुनील गणाचार्य सरचिटणीस गजानन नागे व उपाध्यक्ष आनंद जरग, सहसचिव महादेव खाडे, आगार अध्यक्ष दिलीप दौड इतर सर्व भाजप पदाधिकारी यांनी शशांक राव यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबाचे पत्र देऊन सर्वतोपरीने आंदोलनात सहभागी होण्याचे आश्वासन दिले.

बेस्ट उपक्रमात सध्या चालू असलेली अतीबिकट परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी, बेस्टच्या बसेस चा ताफा पूर्ववत करण्यासाठी, कामगारांचे प्रश्न आणि प्रलंबित मागण्या मंजूर करण्यासाठी शशांक राव कॅनडा ब्रिज, ऑपेरा हाऊस, येथे उपोषणाला बसलेले आहेत. मुंबईची लालपरी व त्या लालपरीसाठी काम करणारे वाहक आणि चालक आणि सर्व कर्मचारी आज फार मोठ्या संकटात सापडलेले आहेत. कामगारांना संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने व मुंबई महानगरपालिकेने मदत करावी. . बेस्ट उपक्रमाच्या मालकीच्या घेण्यात याव्यात, अशा अनेक प्रलंबित मागण्या व त्यासाठी लागणारा आर्थिक निधी शासनाने लवकरात लवकर देऊन बेस्ट कामगारांना न्याय द्यावा, त्यासाठी १० नोव्हेंबरपासून शशांक राव चर्नीरोड ऑपेरा हाऊस कॅनडा ब्रिज येथे उपोषणाला बसलेले आहेत.

# जनतेची कामं करतो म्हणून जनता निवडून देते : अजित पवार

**मुंबई (प्रतिनिधी):**

आम्ही सत्तेचा गैरवापर कधी केला नाही, आम्ही सत्तेचा गर्व कधी केला नाही, कारण सत्तेचा गैरवापर जास्त काळ टिकत नसतो. आम्ही जनतेची कामं करतोय म्हणून जनता आणि प्रत्येक समाजघटक आम्हाला ८ - ८ लाखाच्या फरकाने निवडून देतात. या जनतेमुळे आणि कार्यकर्त्यांमुळेच आम्ही निवडून येतो अशी स्पष्ट कबुली राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

आष्टी - पाटोदा - शिरुर मतदारसंघातील भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आज आपल्या असंख्य पदाधिकाऱ्यांसह अजित पवार यांच्या उपस्थितीत जाहीर पक्षप्रवेश महिला विकास मंडळ सभागृह मुंबई येथे केला. राष्ट्रवादी काँग्रेस नेहमीच सर्व घटकांच्या पाठीशी उभा राहिला आहे असे आश्वासन पवार यांनी दिले.

# चैत्यभूमीवरील सोयी-सुविधांचे नियोजन करा : राजेश कुमार

## नियंत्रण कक्ष, वैद्यकीय सेवा, भोजन व्यवस्था आदींची जय्यत तयारी




**मुंबई (प्रतिनिधी) :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दरवर्षी लाखो अनुयायी मुंबईतील दादर येथील चैत्यभूमीवर येतात. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने सूक्ष्म नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने चैत्यभूमी व शिवाजी पार्क येथे पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबत मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.

या बैठकीस अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, अपर विभागीय आयुक्त कोकण सिद्धराम सालीमठ, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सो. ना. बागुल, नगरविकास विभागाच्या सहसचिव विद्या हम्पय्या, महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, चैत्यभूमी परिसरात मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहदारीचे योग्य नियोजन आणि नियंत्रण करावे. अनुयायांना मार्गदर्शन मिळावे यासाठी जागोजागी सूचना फलक लावावेत. तसेच बैठकीत महापरिनिर्वाण दिवशी पालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

### हिरकणी कक्षांचीही सुविधा उपलब्ध

महिलांसाठी स्वतंत्र असे पिंक टॉयलेट्स, हिरकणी कक्ष, अतिरिक्त प्रसाधनगृह सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासोबतच संपूर्ण परिसरात स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात येणार आहे. पायवाटांवर धूळ प्रतिबंधात्मक आच्छादनाचीदेखील व्यवस्था करण्यात येणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले. रांगेतील अनुयायांसाठी, मुख्य रस्त्यांवर, इंदू मिल परिसर, शिवाजी पार्क याठिकाणी अतिरिक्त शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. महिलांसाठी पिंक टॉयलेटची व्यवस्था ५ ते ६ ठिकाणी करण्यात येणार आहे. तसेच माता आणि बालकांच्या सुविधेसाठी हिरकणी कक्षांचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त हजारो अनुयायी मैलाचा प्रवास करून ६ डिसेंबर रोजी, दादर, चैत्यभूमी येथे दाखल होतात. यानिमित्ताने या परिसराचे रंगरूप पालटण्यासाठी कामगारवर्ग तयारी करण्यात व्यस्त आहेत.
(छाया : अरुण पाटील)

# 'पिंक ऑटो'ला रोटरीचा हिरवा झेंडा

**कांदिवली (वार्ताहर) :**

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४१ ने महिलांना सक्षम करण्यासाठी रोटरीच्या अग्रगण्य पिंक ऑटो इनिशिएटिव्ह अंतर्गत राष्ट्रीय अध्यक्ष रोटर्न यांनी "पिंक ऑटो"ला हिरवा झेंडा दाखवला. या प्रसंगी बोलताना, रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. मनीष मोटवानी म्हणाले की, व्यक्तींमध्ये, समुदायांमध्ये आणि जगभरात कायमस्वरूपी बदल घडवणे हे रोटरीचे ध्येय आहे. यां उपक्रमास आंतरराष्ट्रीय अध्यक्ष रोटर्न अरेझो यांची उपस्थिती लाभल्याने सेवेच्या प्रवासाला मोठी प्रेरणा मिळाली. एकूण १० महिलांना "पिंक ऑटो" च्या माध्यमातून स्वावलंबी होण्याचा मार्ग मिळाला. हा प्रकल्प सामान्य पार्श्वभूमी असलेल्या महिलांमध्ये स्वावलंबी उद्योजक, निर्माण करत आहे. रोटरीच्या या उपक्रमात प्रत्येक लाभार्थीला वाहनाच्या डाउन पेमेंटसाठी ५०% निधी मदत मिळतो.



# पुनर्विकासाच्या मागणीसाठी १८ नोव्हेंबरला पागडीधारकांचा शिवाजी पार्क ते आझाद मैदान मोर्चा

**मुंबई :** बीडीडी चाळींचा पुनर्विकास होत असून त्यांना मुंबईतच पाचशे चौरस फुटांच्या घरांच्या चाव्या मिळत आहेत. मात्र शंभर वर्षे जीर्ण इमारतीत हे पागडीधारक जीवन कंठत आहेत. त्यामुळे पुनर्विकासाच्या मागणीसाठी पागडी एकता संघाने १८ नोव्हेंबर रोजी शिवाजी पार्क ते आझाद मैदान मोर्चाची हाक दिली आहे. न्यायालयाच्या आदेशामुळे दक्षिण मुंबईतील तब्बल १३,८०० इमारतींच्या पुनर्विकासाला खीळ बसली आहे. त्यामुळे १० लाखांहून अधिक कुटुंबे पागडीच्या शंभर वर्षांपूर्वीच्या जीर्ण इमारतीत धोकादायकरित्या वास्तव्य करत आहेत. मुंबईतल्या हजारो पागडी चाळी आणि इमारतींच्या पुनर्विकासासाठी २०२२ साली ७९ अ कायदा अमलात आणला होता. परंतु गर्भश्रीमंत पागडी घरमालकांच्या संघटनेने त्या कायद्याला आव्हान दिले होते.

# माहीममध्ये उबाठाकडे मनसेची खुल्या प्रभागांची मागणी

## पाचपैंकी तीन खुले प्रभाग घेण्याचा मनसेचा विचार

**सचिन धानजी**

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण प्रक्रिया पार पडल्यानंतर आता इच्छुकांची भाऊगर्दी आणि महायुती व महाविकास आघाडीत जागा वाटपाला जोर येणार आहे. दक्षिण मध्य मुंबईतील माहीम विधानसभा क्षेत्र हे उबाठा आणि मनसे युतीचा प्रमुख केंद्र ठरणार आहे. या मतदार संघात पाच प्रभाग असून मनसेकडून तीन प्रभागांची मागणी होणार आहे. तीन खुल्या प्रवर्गासाठी मनसेची जोरदार मागणी असून उबाठा आता मनसेला या जागा सोडणार का याकडे सर्वांचे लक्ष असेल.

मुंबईतील माहीम विधानसभा क्षेत्रात नगरसेवकांचे पाच प्रभाग येत असून यामध्ये सध्या भाजपचा एकमेव नगरसेवक असून उर्वरित चार प्रभागांमध्ये शिवसेना आणि उबाठाचे प्राबल्य आहे. यामध्ये प्रभाग १८२(ओबीसी), प्रभाग १९० (खुला प्रवर्ग), प्रभाग १९१(ओबीसी महिला), प्रभाग १९२ (खुला प्रवर्ग), प्रभाग १९४ (खुला) असे आरक्षण पडले आहे. या निवडणुकीत उबाठा मनसे यांची युती असल्याने यामध्ये यातील प्रभाग क्रमांक १९०, १९२ आणि १९४ प्रभागांवर मनसेचा दावा असेल तर उबाठाच्या वाट्याला प्रभाग क्रमांक १८२ आणि प्रभाग क्रमांक १९१ येवू शकतील असा अंदाज आहे. मनसेची तीन प्रभागांची मागणी मान्य न झाल्यास प्रभाग क्रमांक १९० आणि १९२ वर मनसेचा पक्का दावा असेल.

तर या मतदार संघात प्रभाग क्रमांक १८२, १९१ आणि १९४ या प्रभागांमध्ये शिवसेनेचा दावा असेल तर भाजपाला प्रभाग क्रमांक १९० आणि १९२ सोडले जाण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी असूनही माहिम विधानसभेत महायुतीचे उमेदवार राहुल शेवाळे यांना मताधिक्य होते, तर विधानसभा निवडणुकीत उबाठा, मनसे आणि शिवसेना तिन्ही पक्षाचे उमेदवार स्वतंत्र लढल्यानंतर शिवसेनेच्या सदा सरवणकर यांचा निसटता पराभव झाला. त्यामुळे या मतदार संघात सदा सरवणकर हे भाजपाच्या मदतीने सर्व प्रभाग आपल्याकडे राखण्याचा प्रयत्न करणार आहे. तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित यांचा पराभव जिव्हारी लागल्यामुळे मनसेने उबाठासोतबत जुळवून घेतल्याने त्यांची उबाठाची ताकद वाढली आहे. त्यामुळे आमदार महेश सावंत हे मनसेच्या मदतीने पाचही प्रभागात आपले प्राबल्य राखण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे मनसेला उबाठा किती जागा सोडते आणि भाजपसाठी किती जागा सोडल्या जातात याकडे सर्वांचे लक्ष असेल.

### संभाव्य प्रभाग आणि उमेदवार

**प्रभाग क्रमांक : १८२ (ओबीसी) (दावा उबाठा)**
**उबाठा** : मिलिंद वैद्य, अभय तामोरे
**शिवसेना** : मिलिंद तांडेल, श्रद्धा पाटील

**प्रभाग क्रमांक : १९० खुला (दावा मनसे)**
**भाजप** : शीतल गंभीर-देसाई,
**मनसे** : मनीष चव्हाण
**उबाठा** : राजू पाटणकर

**प्रभाग क्रमांक : १९१ (ओबीसी महिला)(दावा उबाठा)**
**उबाठा** : दीपाली साने, वैशाली पाटणकर
**शिवसेना** : प्रिया सरवणकर

**प्रभाग क्रमांक १९२ (खुला प्रवर्ग) (दावा मनसे)**
**भाजपा** : जितेंद्र राऊत, अक्षता तेंडुलकर, सचिन शिंदे
**मनसे** : यशवंत किल्लेदार

**प्रभाग क्रमांक १९४ (खुला प्रवर्ग)**
**उबाठा** : भगत
**मनसे** : यशवंत किल्लेदार/ संतोष धुरी
**शिवसेना** : समाधान सरवणकर

## मराठी भाषा सप्ताहानिमित्त तंत्रज्ञान आणि परंपरेचा सुंदर संगम

# 'श्रुतलेख'द्वारे प्रथमच बहुभाषिक भाषांतराची सुविधा उपलब्ध

**मुंबई (प्रतिनिधी) :**

अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त अमरावती येथे झालेल्या भारतीय अभिजात भाषा परिषदेत तंत्रज्ञान आणि परंपरेचा सुंदर संगम पहायला मिळाला. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात ६ ते ८ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित या परिषदेत देशातील अकरा अभिजात भाषांचे तज्ज्ञ, संशोधक आणि विद्वान सहभागी झाले होते. या परिषदेत डिजिटल इंडिया भाषींनी विभागाने विकसित केलेल्या "श्रुतलेख" या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित स्पीच-टू-टेक्स्ट उपयोजकाद्वारे प्रथमच थेट बहुभाषिक भाषांतराची सुविधा



उपलब्ध करून देण्यात आली.

या अभिनव प्रयोगामुळे परिषदेत झालेले भाषण आणि विचार विविध भाषांतील प्रेक्षकांना एकाच वेळी त्यांच्या भाषेत स्क्रीनवर दिसत होते. अशा प्रकारचा हा देशातील पहिला प्रयोग ठरला असून, भाषा क्षेत्रातील डिजिटल नवकल्पनेच्या दिशेने भारताने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.

मराठी भाषा विभाग आणि रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत केंद्र व राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी, तज्ज्ञ आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठी भाषा व उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांनी परिषदेला संबोधित करताना सांगितले की, "पहिल्यांदाच देशातील सर्व अभिजात भाषांचे स्वर एकाच मंचावर आणि डिजिटल माध्यमातून ऐकू आले. 'श्रुतलेख' या ॲपच्या माध्यमातून भाषेतील अडथळे दूर होत आहेत. ही केवळ तांत्रिक नव्हे, तर सांस्कृतिक एकतेची नवी दिशा आहे." परिषदेला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगांवकर, तसेच संत गाडगेबाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाटे उपस्थित होते.

### पारंपरिक 'दिंडी' मिरवणुकीने परिषदेची सुरुवात

परिषदेची सुरुवात पारंपरिक 'दिंडी' मिरवणुकीने झाली. मेळघाट आदिवासी समुदायाच्या पारंपरिक नृत्य, गीत व लेझीम सादरीकरणाने कार्यक्रमाचे वातावरण भारावून गेले. या परिषदेत तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम, ओडिया, मराठी, प्राकृत, पाली आणि आसामी या भाषांतील तज्ज्ञांनी अभिजात भाषांच्या जतन, संवर्धन आणि भविष्याविषयी विचारमंथन केले.

## वेचक

### कर्जतमधून आळंदीकडे दिंडी मार्गस्थ



**कर्जत :** तालुक्यातून अनेक वर्षे आंळदीला पायी दिंडी जाते. हालिवली येथील ह.भ.प मारुती महाराज राणे यांच्या मार्गदर्शनाखाली व ह. भ. प. दिलीप महाराज राणे नेतृत्वाखाली कर्जत तालुक्यातील हालिवली ते आंळदी अशा कोकण विभागीय पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. सकाळी दिंडी हालिवली येथून आंळदी येथे जाण्यास निघाली. या पायी दिंडीचे हे एकतीसावे वर्षं आहे. हालिवली येथून निघालेली पायी दिंडी रेल्वे लाईन ओलांडुन छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ आली. त्याठिकाणी कर्जतच्या माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे व दत्तात्रेय म्हसे यांनी या दिंडीचे स्वागत केले. त्यानंतर कशेळे परिसरातून आलेली पायी दिंडी ही कपालेश्वर मंदिरात आली आणि मंदिरात अभंग, भजन सादर करून पळसदरी मार्गे आंळदीकडे मार्गस्थ झाली.

### तळा भागात दवावर येणाऱ्या भाज्यांना मागणी

**तळा :** शहरासह ग्रामीण भागात दवावर पिकणाऱ्या भाज्यांना तळा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर मागणी येत आहे. भात काढणीनंतर तळा तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर गावठी भाज्यांचे उत्पादन घेतले जाते. यामध्ये मेथी, मुळा, पालक, माठ या भाज्यांचा समावेश असतो. सध्या दवावर पिकणाऱ्या या भाज्यांची बाजारात मागणी असून तळा परिसरातील नागरिक या भाज्यांना पहिली पसंती देतात. यामध्ये मेथी, पालक, माठ, मुळा, चाकवत, कोथिंबीरचाही समावेश आहे. तळा शहरातील बाजार परिसरात दवावर पिकवलेल्या गावठी भाज्या पाहायला मिळतात, त्याची आवकही वाढली आहे. हिवाळ्यात भाजीपाला उत्पादन घेतले जाते. सकाळच्या वेळी तळा शहर आणि बाजारात ही भाजी विक्रीला येते. शेतकऱ्यांनाही आर्थिक फायदा होतो. तळा तालुक्यात थंडीची चाहूल सुरू झाली असून शेतकरीही मोठ्या प्रमाणावर दवावर पिकणाऱ्या या भाज्याचे उत्पादन घेत आहेत.

### कामोठेत ५ ठिकाणी भरणार रोजचा बाजार

**पनवेल :** सिडकोचा अनेक ठिकाणचा विकास हा फक्त कागदावर होता; मात्र पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर तो विकास प्रत्यक्षात उतरतो आहे. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपण सर्वजण हा विकास वेगाने व्हावा यासाठी कार्यरत आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते कामोठे येथे आयोजित दैनिक बाजारांच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने कामोठे परिसरात ५ ठिकाणी दैनिक बाजार उभारण्यात येणार आहे. एकूण ८ कोटी ८४ लाख ६ हजार ४८३ रुपयांच्या निधीतून हे काम करण्यात येणार असून, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने यासाठी पाठपुरावा केला. त्यानुसार हे काम मंजूर झाले असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी नगरसेवक दिलीप पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन पार पडले.

### निसर्ग हास्य क्लबचा १०वा वर्धापन दिन साजरा



**अलिबाग :** हास्य योग ते निसर्ग योग क्लब हा प्रवास फक्त लोकांची मागणी म्हणून नव्हे, तर सामाजिक स्वास्थ्य ही भविष्याची खरी गरज लक्षात घेऊन सुरू केला, असे प्रतिपादन निसर्ग हास्य योगा क्लबचे संस्थापक हेमंत गवाणकर यांनी केले. निसर्ग योग क्लबच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. हसण्यामुळे मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारते, ताणतणाव कमी होतो आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. समाजातील सर्व घटकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. पेण नगरपालिका अग्निशामक दल इमारतीत हा उपक्रम दररोज सकाळी ६.४५ ते ८ दरम्यान नियमित राबवला जातो. नागरिकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या उपक्रमाला पेण शहरात विशेष स्थान प्राप्त झाले आहे.

### किल्ले बांधणीत विजयी स्पर्धकांचा सन्मान

**नांदगाव मुरुड :** मुरुड तालुक्यातील मजगांवच्या श्री शिवभक्त मित्र मंडळाने विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या सुट्टीत तालुकास्तरीय किल्ले बांधणी स्पर्धा आयोजित केली होती. या किल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मजगावच्या विठ्ठल मंदिरात नुकताच पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात शिव प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमास विघ्नेश माळी, ऋषीकांत डोंगरीकर, यशवंत पाटील, जयेंद्र काबूकर, केतन नाक्ती इतर मान्यवर उपस्थित होते. प्रथम क्रमांक पार्थव भेर्ले किल्ले पन्हाळा, द्वितीय क्रमांक अर्णव काटकर-किल्ले-प्रतापगड (वळके) तृतीय क्रमांक अर्चित ठाकूर, किल्ले पद्मदुर्ग उत्तेजनार्थ-हिमांशू पाटील, सिंधुदुर्ग, तर मोठा गट प्रथम क्रमांक शौर्य मोकल यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमामध्ये मुरुड पोलिसांनी आयोजित केलेल्या एकता मॅरेथॉन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या होता सर्वेश काबुकर व हरियाणा व धुळे येथे झालेल्या कराटे स्पर्धेत रेश्मा भोईर व काव्या नाक्ती यांचा सत्कार करण्यात आला.



## वाडिया वाचनालयात चिंतन

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:ग्रंथ हे जीवनासाठीचे उत्तम मार्गदर्शक असतातच, वाचेल तो वाचेल, हे सत्य आहेच. याचन चळवळीचे स्वरूप बदलते आहे.. तेही स्वीकारले जाते. वाचनासोबतच ग्रंथाचा अभ्यास, चर्चा, चिंतन हा उपक्रम आपण हाती घेतलेला आहे. त्याअनुषंगानेच दर बुधवारी असणाऱ्या ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाच्या ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात बुधवार दि. १२-११-२०२५ रोजी सायं. ५.३० ते ६.३० या वेळेत याचनालयाच्या सभागृहात सावरकर महाविद्यालयाचे प्रा. कृष्णा रामदासी यांचे ज्ञानेश्वरीवर चिंतन संपन्न झाले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन प्रमुख व्याख्याते प्रा. कृष्णा रामदासी, डॉ. अनुराग पांगरीकर, यांच्या हस्ते संपन्न झाले. यानंतर प्रमुख वक्ते प्रा. कृष्णा रामदासी यांचे स्वागत डॉ. अनुराग पांगरीकर पुष्पगुच्छ देऊन केले. सदरील कार्यक्रम अमोलकचंद सुराणा, डॉ. रोहिणीताई वैद्य, ॲड. कालीदासनाना थिगळे, डॉ. हेमलता पाटील, डॉ. अनुराग पांगरीकर, ॲड. गोविंद कासट यांच्यासह कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# बेकायदेशीर वाळू उपशावर छापा

**दणका : अंभोरा पोलिसांची धडक कारवाई**



पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील, मौजे देवी निमगाव येथील नदीपात्रात सुरू असलेल्या बेकायदेशीर वाळू उपशावर अंभोरा पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे ५० लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दीपक कर्डीले व त्याचे तीन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी सध्या फरार आहेत.याबाबत अंभोरा पोलिसांकडून देण्यात आलेली अधिक माहिती अशी की,आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत देवी निमगाव परिसरात नदी पात्रात वाळू उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळताच त्यांनी तत्काळ सापळा रचून धाड टाकली. तपासादरम्यान नदीपात्रात एक गउइ, दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, वाळू धुण्यासाठी वापरले जाणारे इंजिन व मोटार तसेच मोठी लोखंडी चाळणी यांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असल्याचे आढळले. पोलीस पाहताच वाहनचालक व कामगार घटनास्थळावरून पळून गेले. काही वेळानंतर दीपक कर्डीले हा इसम तेथे आला आणि नमूद वाहने त्याची असल्याचे सांगितले. त्याने वाळू उपसा करण्याचा परवाना असल्याचे सांगितले, मात्र संबंधित परवानगीची कोणतीही कागदपत्रे सादर करू शकला नाही.घटनास्थळी आलेल्या तहसीलदार आष्टी यांनी पाहणी करून सांगितले की, दीपक कर्डीले यास वाळू उपसा करण्याचा कोणताही परवाना देण्यात आलेला नाही. चौकशीतून हे स्पष्ट झाले की दीपक कर्डीले व त्याचे साथीदारांनी स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे वाळू उपसा करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला.या प्रकरणी शासन तर्फे दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत ५०,४५,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार रामदास गिरी यांच्याकडे सुरु आहे.ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावंत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आष्टी श्री. बाळकृष्ण हनपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.सदर मोहिमेत अंभोरा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री. मंगेश साळवे, पो.उ.नि. चंद्रकांत तावरे, आदिनाथ भडके, पो.ह. रामदास गिरी, पो.शि. सतीश पैठणे, तुषार मिसळे व कृष्णा लव्हारे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## अंभोरा पोलिसांचा अभिनव उपक्रम

**नवीन कायदा जनजागृती स्पर्धा**



पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये नवीन फौजदारी कायद्यांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने अंभोरा पोलीस ठाण्याच्या वतीने नवीन कायदा जनजागृती ऑडिओ/व्हिडिओ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे.स्पर्धेचा विषय नवीन फौजदारी कायदे जनजागृती असून भारतीय न्याय संहिता (BNS), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) आणि भारतीय साक्ष्य अधिनियम (BS-) याविषयी जनजागृती हा यामागचा मुख्य हेतू आहे. सहभागी १ ते ५ मिनिटांचा ऑडिओ किंवा व्हिडिओ तयार करून तो ७५८८१७५१८८ या Whats-pp क्रमांकावर पाठवू शकतात.स्पर्धेत विद्यार्थी आणि सामान्य नागरिक असे दोन गट असून प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे २१००, १५०० आणि ११०० अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. सर्वांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल. उत्कृष्ट कृतींना पोलीस विभागाच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर प्रसिद्धी मिळणार आहे. प्रभारी अधिकारी मंगेश साळवे यांनी सर्वांना या उपक्रमात उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान अंभोरा पोलीस ठाण्याच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. असे नवीन उपक्रम सातत्याने राबविणे काळाची गरज आहे. अशा लोकभावना उमटत आहेत.

## पवित्रम् मोबाईल पचे लोकार्पण

**स्वामी गोविंददेव गिरी महाराजांच्या हस्ते लोकार्पण**




पुण्यभूमी प्रतिनिधी
पुणे:हिंदू व्यावसायिक आणि ग्राहकांना एकत्र आणण्यासाठी पवित्रम् फाऊंडेशनने विकसित केलेल्या ङ्गपवित्रम्फ मोबाईल पचा लोकार्पण सोहळा रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ६ वाजता एरंडवणे येथील शकुंतला जगन्नाथ शेट्टी ऑडिटोरियम येथे होणार आहे.या पचे उद्घाटन श्रीराम जन्मभूमी न्यास, अयोध्या चे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते होणार असून, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.पवित्रम् फाऊंडेशनचे अध्यक्ष सुबोध शहा यांनी सांगितले की, या पद्वारे हिंदू व्यापारी आणि ग्राहकांना जोडून स्वदेशी व धार्मिक मूल्यांवर आधारित आर्थिक सक्षमीकरण साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. व्यापाऱ्यांना आपली उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवता येतील, तर ग्राहकांना विश्वासार्ह व्यावसायिकांची माहिती एका क्लिकवर मिळेल.हिंदू खरेदी हिंदूंकडून ही संकल्पना प्रत्यक्षात आणत हिंदू समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, हा संस्थेचा हेतू असल्याचे तुषार कुलकर्णी यांनी सांगितले. या सोहळ्यात समाजातील व्यावसायिक, उद्योगपती आणि युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन फाऊंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी अजित पवार गट मैदानात

**नगराध्यक्ष पदासाठी शितल दाभाडेंचा अर्ज**




पुण्यभूमी प्रतिनिधी
गेवराई:राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा गटाच्या वतीने मा.आ. अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली मा. नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे यांच्या पत्नी सौ. शितलताई महेश दाभाडे यांनी नगराध्यक्ष पदासाठी साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल केला.गेवराई नगरपरिषद ची निवडणूक अतिशय चुरशीची होणार असून प्रचाराला वेग आला आहे. नगराध्यक्ष पदासाठी भाजप व राष्ट्रवादीमध्ये काट्याची टक्कर होणार असून ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर होणार असल्याचे बोलले जात आहे. विजयसिंह पंडित आमदार झाल्यानंतर त्यांनी गेवराई शहराकडे बारकाईने लक्ष देऊन ११ महिन्यात अतिशय वेगाने गेवराई शहरात विकासाची भरपूर कामे केली. या झालेल्या कामामुळे गेवराई शहराच्या वैभवात भर पडली आहे. तसेच नगरपरिषद ची निवडणुकी विकासाच्या मुद्द्यावर होणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून सर्वसाधारण घरातील सौ.शितल महेश दाभाडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दि. १३ गुरुवार रोजी अतिशय साध्या पद्धतीने दाखल केला त्यामुळे सर्वसामान्यांचा उमेदवार म्हणून त्यांची गेवराई शहरात प्रतिमा निर्माण झाली आहे. तसेच ही निवडणूक अतिशय चुरशीची होणार असून प्रस्थापितांना सर्वसाधारण घरातील उमेदवार टक्कर देणार आहे.

## राशप पक्षाकडून वोट जिहाद?

**बीड नगराध्यक्षपदासाठी मुस्लिमच उमेदवार:केशव रत्नपारखे**



पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:नगरपरिषदेच्या इतिहासात प्रथमच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी नगराध्यक्षपद राखीव आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून लोकसभा व विधानसभा निवडणुकीप्रमाणे पुन्हा एकदा बीड नगरपरिषद निवडणुकीत ङ्गवोट जिहादफ्ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. एससी महिलेला नगराध्यक्ष पद राखीव असतानाही अप्रत्यक्षरीत्या मागासवर्गीय महिलेच्या आडून मुस्लिम व्यक्तीलाच प्रतिनिधित्व देण्याचा घाट घातला जात आहे, असा आरोप हिंदुत्ववादी संघटनांकडून केला जात आहे.समस्त हिंदू आघाडीचे केशव रत्नपारखे यांनी पत्रकात म्हटले की, बीड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव आहे. या पदावर खऱ्या अर्थाने आंबेडकरी विचारसरणी असलेल्या उमेदवाराला संधी मिळेल, अशी अपेक्षा समाजातून होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व बीडचे आमदार यांनी अप्रत्यक्षरीत्या मुस्लिम उमेदवाराला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये ङ्गवोट जिहादफ्च्या स्वरूपात काय घडले होते, हे आपण पाहिले आहे. त्याचीच पुनरावृत्ती बीड नगरपरिषद निवडणुकीत होताना दिसत आहे. त्यामुळे विकासाचे कोणतेही व्हिजन नसलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा हा कुटील डाव जनतेने लक्षात घेण्याची वेळ आली आहे. केवळ मतापुरता मागासवर्गीय व मुस्लिमांबद्दलचा पुळका दाखवायचा आणि मते मिळवायची हा शरद पवारांच्या पक्षासह नेत्यांचा जुना फंडा झाला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा ङ्गवोट जिहादफ्ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न हाणून पाडावा, असा इशारा समस्त हिंदू आघाडीचे केशव रत्नपारखे यांनी दिला आहे.

## बीड नगराध्यक्षपदावर अन्याय!

**एससी महिलेऐवजी मुस्लिम उमेदवाराला संधी?**



पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी नगराध्यक्ष पद राखीव ठरले आहे. मात्र, या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून केवळ कागदपत्रांवर अनुसूचित जातीची ओळख असलेल्या महिलेला उमेदवारी देऊन प्रत्यक्षात मुस्लिम समाजातील व्यक्तीमार्फत राजकारण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निर्णयामुळे मागासवर्गीय समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. प्रेम कांबळे, अजय धनवे यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड नगरपरिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव असल्याने, आंबेडकरी चळवळीत कार्यरत असलेल्या खऱ्या मागासवर्गीय उमेदवाराला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ कागदपत्रांवरून अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असलेल्या महिलेला पुढे करून पक्षाने मागासवर्गीय समाजाची फसवणूक केल्याचा आरोप धनवे यांनी केला आहे. आंतरजातीय विवाह केलेल्या महिलेला उमेदवारी देऊन मागासवर्गीय समाजाच्या प्रतिनिधित्वाचा अवमान करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. हा प्रकार दलित समाजाचा विश्वासघात असल्याचे सांगत, धनवे यांनी खऱ्या आंबेडकरी चळवळीतील उमेदवाराला न्याय मिळावा, अशी मागणी केली जात आहे. अन्यथा, या अन्यायाचा निषेध म्हणून दलित समाज निवडणुकीत योग्य पक्षाला जागा दाखवून देईल, असा इशाराही त्यांनी पत्रकातून दिला आहे. दरम्यान बीड नगर परिषद अध्यक्ष पदासाठी मागासवर्गीय उमेदवारच देण्यात यावा,अशी मागणी होत आहे.

# धारुरचे शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत

**पक्षांतर : अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वात ताकद वाढली**



पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल कार्य प्रणालीला प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख सन्माननीय अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत, शिवसेना तालुका प्रमुख किल्लेधारूर नारायण कुरुंद यांच्या माध्यमातून किल्लेधारूर नगर परिषद नगराध्यक्ष पदाचे प्रबळ दावेदार सुरेश आण्णा गवळी यांच्या समवेत किल्लेधारूर येथील नगरसेवक पदाचे प्रबळ दावेदार शौकेत शेरशहा इनामदार, दिलीप नवनाथ सिरसाट, बबलू सुधाकर सावंत, अशोक संभाजी शिंगारे, गीतांजली रघुनाथ पांचाळ, शेख नदीम, कृष्णा माणिक लोखंडे, लक्ष्मीबाई रमेश पारवे, तुषार औताडे, कृष्णा गायके, अरुणा सुरेश जोगदंड, इरफान शेख, मुनाफ शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. दरम्यान हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या ज्वलंत विचारधारेने प्रेरित होऊन, राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख मा. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल नेतृत्वाने प्रभावित होऊन, किल्लेधारूर तालुक्यातील अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेचा भगवा स्वीकारला. शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नाही, तर ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतीक आहे. या पक्षात कार्यकर्त्यांना मान, सन्मान आणि संधी मिळते. एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात विकासाचा नवा अध्याय लिहिला जात आहे.

## गेवराई भाजपला मोठा धक्का!

**जानमोहमंद बागवान राष्ट्रवादी**



पुण्यभूमी प्रतिनिधी
गेवराई:राजकारणात मोठा भूकंप घडवणारी घटना घडली आहे. गेवराई नगरपरिषदेतील भाजपचे जेष्ठ व अनुभवी नगरसेवक जानमोहमंद बागवान यांनी आज बीड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्षा मध्ये औपचारिक प्रवेश केला. या प्रवेशामुळे भाजपला मोठा धक्का बसल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.बीड येथे झालेल्या या कार्यक्रमाला आमदार संदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, प्रवक्ते शिवराज बांगर युवा नेते राजेंद्र मोटे, तसेच तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्वांच्या हस्ते जानमोहमंद बागवान यांचा पक्षात जाहीर स्वागत सोहळा पार पडला.दरम्यान या प्रवेशामुळे राष्ट्रवादीची ताकद आणखीन वाढली आहे. त्यामुळे गेवराईत वेगळे चित्र आहे.